www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
# युवक आधार
मराठी

संपादक - संतोष शिवदास आमले

मुख्य संपादक - भारती आमले | उपसंपादक - श्री विलास गायकवाड | कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे | निवासी संपादक- श्री राकेश पाटील | सह संपादक - श्री मुकुंद कांबळे | महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 | अंक : ६० | शनिवार, ०८ नोव्हेंबर २०२५ | किंमत : ४ रु | पृष्ठ : ८ | RNI MAHMAR/2023/89514




## सतरा लाखांचे बक्षीस असलेल्या महिला नक्षलवाद्याचे आत्मसमर्पण!

**दैनिक युवक आधार**
**नवी दिल्ली, प्रतिनिधी**

केंद्र सरकारनं देशातून नक्षलवाद संपवण्याचा विडा उचलला आहे. त्यासाठी विविध योजना केंद्र सरकारकडून राबवण्यात येत आहेत. दरम्यान छत्तीसगडमधील खैरागड पोलिसांना एक मोठं यश मिळालं आहे. १७ लाख रुपयांचं बक्षीस असलेल्या एका नक्षलवादी महिलेनं पोलीस अधीक्षकांसमोर आत्मसमर्पण केलं आहे. कमला सोडी असं या महिलेचे नाव असून ती ३० वर्षांची आहे. कमला सोडी ही कट्टर नक्षलवादी म्हणून नक्षलवादी संघटनेत सक्रिय होती.

**२०११ पासून नक्षलवादी संघटनेत सक्रिय :** बक्षिसाची मोठी रक्कम जाहीर असलेल्या कमला सोडी हिने खैरागड येथील पोलीस अधीक्षक कार्यालयात महानिरीक्षक अभिषेक शांडिल्य आणि पोलिस अधीक्षक लक्ष्य शर्मा यांच्या उपस्थितीत



आत्मसमर्पण केलं. कमला सोडी ही २०११ पासून नक्षलवादी संघटनेत सक्रिय होती आणि मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि छत्तीसगडमधील एमएमसी झोनमध्ये संघटनात्मक आणि हिंसक कारवायांमध्ये सहभागी होती. तसंच सुरक्षा दलांकडून नक्षलवाद्यांवर वाढत्या दबावामुळं आणि सरकारच्या धोरणांमुळं प्रभावित होऊन कमला सोडी हिनं आत्मसमर्पण केलं आहे.

**नक्षलवादी माड डिव्हिजनची कॅडर :** कमला सोडी ही बस्तर एमएमसी झोनमधील महिला नक्षलवादी माड डिव्हिजनची कॅडर होती आणि संघटनेत सक्रियपणे सहभागी होती.

## लाडकी बहीण योजनेत १८ नोव्हेंबरपर्यंत ई-केवायसी पूर्ण करणे अनिवार्य

**दैनिक युवक आधार**

**ठाणे :** राज्य शासनाच्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत ठाणे जिल्ह्यातील सर्व लाभार्थ्यांनी आपली ई-केवायसी प्रक्रिया १८ नोव्हेंबरपूर्वी पूर्ण करणे आवश्यक असल्याचे आवाहन महिला व बालकल्याण विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी संजय बागुल यांनी केले.ही योजना महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी राज्य सरकारने सुरू केलेली महत्त्वाची योजना असून पात्र महिलांना दरमहा आर्थिक मदत मिळते. हा लाभ अखंडपणे सुरू राहण्यासाठी ई-केवायसी पूर्ण असणे बंधनकारक आहे.

ई-केवायसी ही लाभार्थ्यांच्या आधार क्रमांक आणि बँक खात्याशी संबंधित माहितीची पडताळणी करण्याची प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया पूर्ण केल्यास पुढील सर्व अनुदान हप्ते कोणत्याही अडथळ्याशिवाय लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होतात.लाभार्थ्यांनी खालील ठिकाणी जाऊन ई-केवायसी पूर्ण करू शकतात. संबंधित अंगणवाडी केंद्र, ग्रामपंचायत कार्यालय, महिला बालविकास कार्यालय, कॉमन सर्व्हिस सेंटर आदी ठिकाणी ई-केवायसी करता येणार आहे.

ई-केवायसी करताना आधार कार्ड, बँक पासबुक, नोंदणीकृत मोबाईल क्रमांक असणे गरजेचे आहे. निर्धारित मुदतीत ई-केवायसी पूर्ण न करणाऱ्या लाभार्थ्यांचे अनुदान तात्पुरते स्थगित राहू शकते. त्यामुळे सर्व पात्र महिलांनी १८ नोव्हेंबरपूर्वी प्रक्रिया पूर्ण करून योजनेतील लाभ घेत राहावेत असे संजय बागुल, जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांनी सांगितले.

# भगव्याचं ठाणे आहेच, पण आता भगव्याचं पुणे करायचं असल्याचे केले आवाहन

### ३ डिसेंबरला आपणच गुलाल उधळणार असल्याचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ठाम विश्वास

**दैनिक युवक आधार**

**पुणे / प्रतिनिधी :** मुख्यमंत्री असताना तुम्ही घरात बसलात! फेसबुकवरून राज्य चालत नाही, जनता संकटात असताना रस्त्यावर उतरावं लागतं. आता शेतकऱ्यांच्या बांधावर फिरताय... पण कमरेवर हात ठेवून उभं राहू नका, या आमच्यासारखे देणारे हात बना!" अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर नाव न घेता प्रखर हल्ला चढवला.

शिंदे म्हणाले "अरे मुख्यमंत्री असताना घरात बसलात, फेसबुकवरून राज्य चालत नाही! जनतेला संकट आलं की आम्ही रस्त्यावर उतरतो, बांधावर फिरतो, शेतकऱ्यांच्या शेतात उभे राहतो. आम्ही देणारे आहोत, घेणारे नाही — आम्ही 'देना बँक' आहोत, ते मात्र 'लेना बँक' आहेत!"

चाकणमधील या सभेत अतुल देशमुख आणि त्यांच्या शेकडो कार्यकर्त्यांचा शिंदे गटात प्रवेश झाला. त्यावेळी शिंदे म्हणाले, "भगव्याचं ठाणे आहेच, पण आता भगव्याचं पुणे करायचं आहे! अतुल देशमुख यांच्या प्रवेशामुळे उत्तर पुण्याची ताकद वाढली आहे. निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झालाय. आता गुलाल उधळण्याची तयारी करा! विरोधकांचं डिपॉझिट जप्त झाल्याशिवाय आम्ही थांबणार नाही!"

शिंदेंनी ठाकरे यांच्यावर अधिक




प्रहार करत म्हटलं, "अडीच वर्षे मुख्यमंत्री असूनही घरात बसलात. राज्य संकटात असताना फेसबुक लाईव्हवरून भाषणं देत बसलात. जनतेला त्याचा काय उपयोग झाला? आम्ही कोल्हापूरचा पूर असो, इर्शाळवाडीचं दु:ख असो स्वतः घटनास्थळी जाऊन उभे राहिलो. निर्णय घेतले, निधी दिला, लोकांना दिलासा दिला. आम्ही काम करतो, फक्त टीका नाही करत!"

शिंदेंनी मंचावरून ठणकावलं, "आम्ही शेतकऱ्यांसाठी ३२ हजार कोटींचं पॅकेज जाहीर केलं, कर्जमाफीचं वचन पाळलं, लाडकी बहिण योजना सुरू केली, महिलांना अर्धं तिकीट दिलं, शेतकऱ्यांना दुहेरी अनुदान दिलं. आम्ही बोलत नाही, थेट देतो. काही लोकं फक्त बोलतात, फोटो काढतात, पोस्ट टाकतात... पण जनतेला काही मिळत नाही!"

शिंदेंनी भाजपसोबतच्या महायुतीवरही आत्मविश्वास व्यक्त केला. "निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. आता २ डिसेंबरला मतदान, ३ डिसेंबरला निकाल आणि निकाल भगव्याचाच येणार! विरोधकांना चारी मुंड्या चित करण्याची तयारी सुरू आहे, त्यामुळे गुलाल उधळण्यासाठी सज्ज व्हा!"

ते पुढे म्हणाले, "काही जण आम्हाला भकास म्हणतात. अरे, अडीच वर्षांत महाराष्ट्र पालथा घातला! पायाला भिंगरी लावली! मुख्यमंत्री राहताना तुम्ही काय केलंत? आम्ही सर्वसामान्यांसाठी काम केलं. महिलांना, शेतकऱ्यांना, कामगारांना दिलासा दिला. जनतेचा विश्वास मिळवला."

सभेत शिंदेंनी शिवसेनेतील ऐक्य, कार्यकर्त्यांचं महत्व आणि बाळासाहेबांच्या विचारांवर ठाम राहण्याचं आवाहन केलं. "हा पक्ष कोणाचा मालकी हक्क नाही, हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे! जो काम करेल, तो पुढे जाईल. बाळासाहेबांनी सांगितलं शिवसेनेतील सगळ्यात मोठं पद म्हणजे शिवसैनिक! आम्ही ते जपलंय आणि जपत राहू. आमचं सरकार काम करणाऱ्यांचं आहे. फक्त बोलणाऱ्यांचं नाही."

शिंदेंनी सांगितलं की पुणे जिल्ह्यासाठी पाच हजार कोटींच्या रस्त्यांच्या योजना, आळंदीतील संत स्मारकासाठी २५ कोटी, महिलांसाठी बचत गट अनुदान, पाणीपुरवठा प्रकल्प, ट्रॅफिकमुक्त चाकण योजना, मेट्रोचा डीपीआर हे सर्व सरकारनं मंजूर केल्याचे सांगितले.यावेळी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार विजयबापू शिवतारे, शिवसेना सचिव राम रेपाळे, इरफान सय्यद, भगवान पोखरकर, नितीन गोरे, मनिषा गोरे, सारिका पवार, सुलभा उबाळे, निलेश पवार, प्रकाश वाडेकर, राहुल चव्हाण आणि शिवसेनेचे सर्व प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते तसेच चाकणमधील असंख्य नागरिक उपस्थित होते.

## अंबा नदी 'विषारी': मच्छीमारांवर उपासमारीची वेळ, शिवसेनेचा रिलायन्सला इशारा

**दैनिक युवक आधार**

**पेण (प्रतिनिधी):** एकेकाळी ज्या अंबा नदीने हजारो कुटुंबांना उदरनिर्वाहाचे साधन दिले, तीच नदी आज रिलायन्स कंपनीच्या रासायनिक सांडपाण्यामुळे 'विषारी' बनली आहे. नदीतील मासे मरत आहेत, पाण्याला दुर्गंधी सुटली आहे आणि मच्छीमारांनी पकडलेली मासळी कुणी विकत घेण्यास तयार नाही. या गंभीर परिस्थितीमुळे मच्छीमार बांधवांवर उपासमारीची वेळ आली असून, त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष रस्त्यावर उतरला आहे.आज शिवसेना रायगड जिल्हा संपर्क प्रमुख प्रसाद भोईर आणि जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने प्रांताधिकाऱ्यांची भेट घेऊन रिलायन्स कंपनीविरोधात कठोर कारवाईची मागणी केली. "कंपनीच्या नफेखोरीसाठी आम्ही आमच्या भूमिपुत्रांचा बळी जाऊ देणार नाही," असा सज्जड दम प्रसाद भोईर यांनी यावेळी दिला.

**मच्छीमारांची व्यथा:**

रासायनिक प्रदूषणामुळे मासे मृत पावत आहेत किंवा स्थलांतरित होत आहेत.बाजारात मासळीला दुर्गंधी येत असल्याने तिला मागणी नाही.पिढ्यानपिढ्या चालत आलेला पारंपरिक व्यवसाय धोक्यात.शिवसेनेने रिलायन्सवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची, तसेच 'प्रदूषक भरेल तत्त्वा'नुसार मच्छीमारांना तातडीने आर्थिक नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे. अन्यथा, तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा



देण्यात आला आहे. याप्रसंगी समिर म्हात्रे, जगदीश ठाकूर, सुहास म्हात्रे आदी पदाधिकारी उपस्थित होते.रिलायन्सच्या प्रदूषणावर २४ तासांत कारवाई करा, अन्यथा NGT मध्ये जाणार: शिवसेनेचा MPCB ला अल्टिमेटमपेण, ७ दीपक लोके: रिलायन्स कंपनीकडून अंबा नदीत सोडल्या जाणाऱ्या रासायनिक सांडपाण्यामुळे होणाऱ्या पर्यावरणाच्या ऱ्हासाची गंभीर दखल घेत, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने प्रशासनाला २४ तासांचा अल्टिमेटम दिला आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (MPCB) तातडीने घटनास्थळी जाऊन पाहणी करावी आणि दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अन्यथा राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणात (NGT) धाव घेऊ, असा स्पष्ट इशारा जिल्हा संपर्क प्रमुख प्रसाद भोईर यांनी दिला आहे.आज प्रांताधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात शिवसेनेने जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) कायदा १९७४ आणि पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ अन्वये कंपनीच्या जबाबदार अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली. तसेच, 'झिरो लिक्विड डिस्चार्ज' प्रणाली कार्यान्वित होईपर्यंत कंपनीचे संबंधित युनिट बंद करण्याचे निर्देश देण्याची मागणीही करण्यात आली.कायदेशीर लढाईची तयारी: जर MPCB ने राजकीय दबावाखाली कारवाई टाळली, तर शिवसेना थेट NGT मध्ये जाऊन दाद मागेल आणि जनआंदोलनाचा मार्ग स्वीकारेल, असे जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांनी स्पष्ट केले. या शिष्टमंडळात समीर म्हात्रे, जगदीश ठाकूर, सुहास म्हात्रे, भगवान पाटील, योगेश पाटील, नंदू म्हात्रे, दीपक पाटील, चंद्रहास म्हात्रे, जयराम बडे आदींचा समावेश होता. प्रांताधिकाऱ्यांनी याप्रकरणी त्वरित कार्यवाहीचे आश्वासन दिले आहे.

# आंबेडकर चळवळीचं काय रे गड्या?

आंबेडकर चळवळीचे काय रे गड्या?

### आंबेडकर चळवळीचत फुटीचे राजकारण !जनतेने कुणाचा आसरा घ्यावा!

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे विदर्भ विभागीय संपादक**

सध्या महाराष्ट्रात विविध आंबेडकरी संघटना व राजकीय पक्ष असून कोणती संघटना कोणाच्या पक्षाखाली काम करते हेच कळत नाही .तर विविध राजकीय पक्ष असलेले आंबेडकर चळवळीतील पक्ष कोणाच्या दावणीला बांधले आहेत हेच कळत नाही .सर्व आंबेडकरी नेत्यांनी आपापल्या नावाने ही दुकानदारी सुरू केली असून निवडणुकी आली की यांना कोणत्या ना कोणत्या पक्षाशी युती करून आपल्या दुकानदारी सुरू ठेवतात व सौदा करून आपले उमेदवार उभे करतात.अगला राजकीय पक्षाचा पुढारी म्हणेल त्या ठिकाणी उभे ठेवतात. यामुळे आंबेडकरी चळवळ कुठेतरी मागे पडत आहे? दुकानदारीच्या मागे आंबेडकरी जनतेने कुठपर्यंत मागे धावावे हे आपले आंबेडकरी नेते यांना खरं समजत नसेल का! की आपण आपल्या कितीही सामाजिक संघटना व कितीही पक्ष असले तरी येणाऱ्या लोकसभा, विधानसभा ,महानगरपालिका, जिल्हा परिषद, नगरपालिका ,नगरपरिषद पंचायत चुनाव मध्ये एकत्र येऊन ज्या पक्षाचे




किंवा सामाजिक संघटनेचे ज्या क्षेत्रात वजन आहे लोकांनी एकत्रित येऊन निवडणुका लढून जागेचं वाटप केलं पाहिजे आणि मताचे विभाजन होत आहे ते एका मतपेटीत कसे येतील याकडे सर्वांनी लक्ष देण्याची काळाची गरज आहे. परंतु आज महाराष्ट्रात स्वतःला आंबेडकरी म्हणणारे नेते गढूळ राजकारण करत आहेत .त्यामुळे आंबेडकरी जनतेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहेत. याला कारणीभूत कोण! नेत्यांनी जनतेला दोष देण्यापेक्षा आपणच सुधारणा करावी ?कोण मोठा आणि कोण लहान यात भेद न करता कोणीतरी समोर येऊन या आंबेडकरी चळवळीचे नेतृत्व करावे? आज आंबेडकरी जनता आपल्या आंबेडकरी विचाराचे नेते केव्हा एकत्र येणार याकरिता चिंतन करत आहेत! परंतु सर्वांनी आपल्या दुकानदाऱ्या सुरू करून यांना कोणत्यातरी विचारसरणीच्या पक्ष्याची युती करून आंबेडकरी जनतेला गुलाम करीत आहेत .ज्या पक्षाचे आमदार ,खासदार आहेत त्या पक्षाचे नेते सुद्धा दुसऱ्या पक्षाची युती करून आपल्याला मजबूत करण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु आपल्याकडे आमदार, खासदार, महापौर ,नगराध्यक्ष काही नसताना आपण सर्व आंबेडकरी गटाचे नेते एकत्र मिळून निवडणुका का लढत नाही ?उलट सर्वच आंबेडकरी पक्षाचे नेते कोणतेही आर्थिक बळ , संघटन नसताना आपल्या पक्षाच्या भरोशावर उमेदवार निवडणुकीत उभे करतात. त्यामुळे मताचे विभाजन मोठ्या प्रमाणात होते व आपला पक्ष कमजोर होते असे या नेत्यांना कळत नसेल का? म्हणजे आंबेडकरी समाजात फुट पाडण्याचे काम नेमके कोण करत आहे! आपले नेते की जनता? म्हणून आंबेडकरी विचाराचे जे पक्ष आहेत त्यांनी एकत्र येऊन निवडणु लढवावी व मताचे विभाजन टाळावे व एकजुटीने संविधानाचे रक्षण करण्याकरता सर्वांनी एकत्र यावे.

# गायींच्या पालनपोषणाचा प्रश्न गंभीर!; सहा महिन्यांपासून अनुदान थकीत; गोशाळांची दमछाक

**दैनिक युवक आधार**
**मुंबई**

राज्यातील नोंदणीकृत गोशाळांना देशी गायींच्या (गोमाता) संगोपनासाठी देण्यात येणारे अनुदान गेल्या सहा महिन्यांपासून रखडल्यामुळे गोशाळा चालकांसमोर मोठा आर्थिक पेच निर्माण झाला आहे.

एकीकडे वाढत्या महागाईमुळे गायींचे पालनपोषण करणे कठीण झाले आहे, तर दुसरीकडे शासनाकडून मिळणारे तुटपुंजे अनुदानही वेळेवर



मिळत नसल्याने 'गोमाते'चा सांभाळ करताना गोशाळांची दमछाक झाली आहे.

राज्यातील देशी गायींना 'गोमाते'चा दर्जा दिल्यानंतर त्यांच्या संगोपन, संवर्धन आणि पालनपोषणासाठी राज्य शासनाकडून आर्थिक सहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

त्यानुसार, नोंदणीकृत गोशाळांना प्रति गाय दररोज ५० रुपये इतके परिषोषण अनुदान दिले जाते. राज्यात एकूण १०६८ गोशाळा आहेत.

मात्र गोशाळांकडे नोंदणी केलेल्या गोशाळांना अनुदान दिले जाते.

गोवंश हत्याबंदीमुळे भाकड व अनुत्पादक गायींना गोशाळांमध्ये दाखल केले जाते.

तसेच, मोकाट जनावरे आणि पोलीस कारवाईनंतर सुटका केलेल्या जनावरांचेही संगोपन गोशाळा करतात.

मात्र, शासनाकडून केवळ नोंदणीकृत गोशाळांतील देशी गायींसाठीच अनुदान दिले जाते, इतर पशुधनासाठी कोणताही आधार मिळत नाही.

शासनाने राज्यातील गोशाळा, गोसदन, पांजरपोळ आणि गोरक्षण संस्थांना बळकट करण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याचा निर्णय घेतला होता.

> "गोशाळांना जानेवारी ते मार्च २०२५ या तीन महिन्यांचे अनुदान मिळाले. मागील सहा महिन्यांपासून अनुदान रखडल्याने गोशाळांना गोमातेचा सांभाळ करताना खूपच कसरत करावी लागत आहे. पूर्वी समाजातील देणगीदारांकडून गोशाळांना मदत मिळत होती. मात्र शासनाकडून अनुदान मिळण्याची घोषणा झाल्यानंतर देणगीदारांचाही हात आखडता घेतला आहे. आता सरकारचे अनुदान वेळेत नाही आणि देणगीदारांकडूनही मदत नाही अशी गोशाळा चालकांची कोंडी झाली आहे. देशी गायींना राज्य मातेचा दर्जा दिला, पण चाऱ्यासाठी पैसे मिळत नाही हे खेदाची बाब आहे.
> - दत्ता रघुनाथ पाहारे, अध्यक्ष माता इंद्रायणी गोशाळा, मानधनी ता. जिंतूर, जि. परभणी

# प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा बळी - विंचूरमध्ये खड्ड्याने घेतला अनिल जाधवांचा जीव!


**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**विंचूर :-** निफाड तालुक्यातील विंचूर येथे नाशिक–छ.संभाजीनगर महामार्गावरील खड्ड्यांमुळे आणखी एका तरुणाचा बळी गेला आहे. वाकी खुर्द (ता. चांदवड) येथील अनिल बबन जाधव (वय ३४) यांचा गुरुवार, दि. ६ नोव्हेंबर रोजी दुपारी ३.२० वाजता झालेल्या भीषण अपघातात मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, जाधव हे आपल्या दुचाकीवरून जात असताना विंचूर येथील वेदांत हॉटेल समोर महामार्गावरील खड्ड्यांमुळे वाहनाचा ताबा सुटला.

यात ते गंभीर जखमी झाले. तात्काळ त्यांना लासलगाव येथील समृद्धी हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना



मृत घोषित केले.

यानंतर त्यांचे पार्थिव लासलगाव ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी नेण्यात आले.

**स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीने महामार्ग दुरुस्तीची मागणी केली आहे. “आता अजून किती बळी घेणार हा महामार्ग?” असा सवाल जनतेतून उपस्थित होत.**

या घटनेमुळे वाकी खुर्द व परिसरात शोककळा पसरली असून, रस्त्याच्या दुरवस्थेबद्दल जनतेत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, नाशिक–छ.संभाजीनगर महामार्गाचे काम गेल्या अनेक महिन्यांपासून संथ गतीने सुरू असून, रस्त्यावर असंख्य खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमुळे दररोज प्रवाशांचे हाल होत असून, संबंधित विभाग आणि ठेकेदार यांच्या निष्काळजीपणामुळे आज एका कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# सामान्य, गोरगरीब आणि कष्टकरी शेतकरी बांधवांचा आवाज — हक्काचं नेतृत्व कैलास बाबासाहेब पवार..!

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी सेलू शिवाजी पवार**

मा.आ.रामप्रसादजी बोर्डीकर साहेबांचे विश्वासू जुने सहकारी कै.बाबासाहेब सखाराम पवार चेअरमन बापू शिंदेटाकळी- सेलू तालुका यांचा मुलाला कैलास बाबासाहेब पवार यांना संधी द्यावी डासाळा पंचायत समिती सर्कल मधुन सेलू तालुक्यातील जुने-नवे साहेबाचे सहकारी, प्रत्येक घटकातुन यांची मागणी__ परभणी जिल्ह्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीचे वारे वाहु लागले आहेत. ग्रामीण जनतेचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी पंचायत समिती सेलू तालुक्यातील निवडणुकीचे पडघम वाजायला सुर्वात झाली आहे . तरी सेलू तालुक्यातील पंचायत समिती डासाळा सर्कल मधून माजी आमदार तथा जिल्ह्याचे लोकनेते मा.श्री. रामप्रसादजी बोर्डीकर साहेबांचे विश्वासू जुने सहकारी कै.बाबासाहेब सखाराम पवार चेअरमन बापू शिंदेटाकळी यांचा मुलाला कैलास बाबासाहेब पवार यांना संधी द्यावी पंचायत





समिती सर्कल मधुन सेलू तालुक्यात जुने सहकारी याची चर्चा रंगत आहे गावोगावी ठिकठिकाणी यांची मागणी वडीला सारखा मुलगा शांत,संयमी , तळागाळातील गोर गरीब जनतेची नाळ जोडलेली आहे तसेच त्याचे प्रश्नाची जाणीव असणारा तसेच जामिनीवर पाय असणारा सामान्य जनतेसाठी झगडणारा आहे . निष्ठावंत व प्रमाणिक विकस कामाच्या माध्यमातून ग्रामपंचायत शिंदेटाकळी सरपंच म्हणून कामाची चुणुक दाखवत आहेत . कै.बाबासाहेब सखाराम पवार यांच्या मुलगा तर आहेच पण यांची सुनबाई पण त्याच्या कामाची चुणूक सामाजिक आणि राजकीय दाखवत आहे सौ अश्विनी कैलास पवार या सर्व तालुक्यातील महिला भगिणी आणि जनतेचे सेवक म्हणून कामाची चुणूक दाखवून दिली आहे. विशेष म्हणजे कै.बाबासाहेब सखाराम पवार यांचा मुलगा कैलास बाबासाहेब पवार आणि सुनबाई सौ अश्विनी कैलास पवार यांनी आपल्या सामाजिक आणि राजकीय कार्यातून तालुक्यात आपली ओळख कामातुन निर्माण केली आहे. त्यामुळे महिला भगीनी तसेच प्रत्येक घटकातुन मागणी आहे यांना संधी द्यावी पंचायत समिती निवडणुकीचे तिकीट साहेबांनी द्यावे . डासाळा पंचायत समिती सर्कल मध्ये दांडगा जनसंपर्क, नाते संबंध मित्र परीवार आहे तसेच डासाळा पंचायत समिती सर्कल मधील शिंदेटाकळी ग्रामपंचायत सरपंच पदी तालुक्यातील पहिली ग्रामपंचायत मोठया मतअधीक्याने जनतेतून सरपंच एक नंबर ग्रामपंचायत निवडून आलेले आहेत.डासाळा पंचायत समिती सर्कल मधुन एक नवीन चेहरा आणि आपल्या सामाजिक कामाबद्दल प्रमाणिक निष्ठेने काम करणारा आहे.तरी कैलास बाबासाहेब पवार यांचा विचार करण्यात यावा अशी मागणी तालुक्यातून होत आहे.

यांचा फायदा भारतीय जनता पक्षाला होईल कारण की पक्षाचा विचार, विकासभुमुक कामे, विवीध योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी यांची धडपड सुरू असते आणि त्याचा लाभ प्रत्येक घटका पर्यंत पोचवतात जसे की लाडकी बहिण, गाव चलो अभियान , स्वच्छ भारत अभियान माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदीजी यांच्या वाढदिवसा निमित्त सेवा पंधरवडा मा. ना. सौ मेघना दिदी साकोरे बोर्डीकर राज्यमंत्री तथा पालकमंत्री परभणी जिल्हा याच्या मार्गदर्शना खाली साजरा करण्यात आला तसेच दिदी यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत आहेत. असे विवीध विकास योजना , लोकभिमुक शासन योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी यांची धडपड तसेच प्रयत्न शील असतात.

# दिवलांग येथील हिमाली धुमाळचे सि.ए.परिक्षेत उज्ज्वल यश

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

चार्टर्ड अकाउटंट सि. ए. ही परीक्षा एक व्यावसायिक पात्रता परीक्षा आहे .जी तीन मुख्य टप्प्यांमध्ये विभागलेले आहे. फाउंडेशन, इंटरमीडिएट आणि अंतिम परीक्षा होय. बारावी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी फाउंडेशन स्थरासाठी पात्र ठरतात तर पदवीधर विद्यार्थी थेट इंटरमीडिएट स्तरासाठी नोंदणी करू शकतात .या परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर तीन वर्षाची आर्टिकल शिफ्ट पूर्ण करावी लागते. त्यानंतर अंतिम परीक्षा देता येते. सी ए म्हणजे सनदी लेखापाल असेही म्हटले जाते .सनदी लेखापाल अर्थव्यवस्थेच्या पारदर्शकतेसाठी आणि प्रगतीसाठी महत्त्वाची भूमिका बजावतात.

अलिबाग तालुक्यातील आंबेपूर पेझारी दिवलांग येथील कु.हिमाली प्रवीण धुमाळ हिने या सनदी लेखापाल सी ए परीक्षा शैक्षणिक क्षेत्रातील एक अत्यंत उच्च दर्जाची, खडतर परिश्रम असलेली परिक्षा आहे. आणि या परीक्षेत हिमाली ने घवघवीत यश मिळवून आपल्या आई-वडिलांचे नाव उंच केले आहे. कठोर मेहनत ,प्रबळ इच्छाशक्ती, जिद्द ,चिकाटी अभ्यासू वृत्ती असेल तर सी.ए.या परीक्षेत यश मिळू शकते हे हिमाली या विद्यार्थिनींने दाखवून दिले.

अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय क्षेत्र न निवडता रूळलेल्या वाटेवरून न जाता तीने खडतर मार्ग अवलंबला. तिने सी.ए. होण्याचे स्वप्न उराशी बाळगले आणि ते स्वप्न तिने आज पूर्ण केले आहे. हिमाली धुमाळ ही अलिबाग तालुक्यातील दिवलांग पेझारी या गावची आगरी समाजातील मुलगी आहे. अगदी लहानपणापासूनच अभ्यासाची आवड असलेली, अतिशय तल्लक आणि हुशार यासाठी तिचे वडील डॉ. प्रवीण केशव धुमाळ हे पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत



समिती रोहा येथे, तर आई करूणा धुमाळ या रोहा तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा पिंगलसई येथे मुख्याध्यापिका असून त्या रोहा येथे वास्तव्यास आहेत. घरातील वातावरणच अभ्यासू आणि अभ्यासाला प्रोत्साहन देणारे असल्यामुळे हिमाली हिस अभ्यासासाठी पोषक वातावरण मिळाले. हिमाली हिचे आईवडील नोकरी निमित्त रोहा येथे वास्तव्यास असल्याने हिमालीचे दहावीपर्यंत शिक्षण जे. एम .राठी इंग्लिश स्कूल रोहा येथे झाले. हिमालीने बोर्डाच्या दहावी व बारावीपर्यंत चे शिक्षण देखील चांगल्या मार्कांनी उत्तीर्ण होऊन पुढे सर परशुराम भाऊ महाविद्यालय पुणे येथे पदवीचे शिक्षण घेऊन सी.ए.चा अभ्यासक्रम पूर्ण करून यशस्वी झाली. हिमाली धुमाळ हिच्या सि.ए.च्या परिक्षेच्या यशाबद्दल तीच्या वर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.हिमाली धुमाळ हिने आपल्या या यशाचे श्रेय तिचे वडील डॉ.प्रवीण धुमाळ आई करूणा धुमाळ आणि गुरुवर्य मळेकर सर यांना दिले आहे. "ध्येय साध्य करण्यासाठी जिद्द,चिकाटी, मेहनत "या त्रिसूत्री चा अवलंब केल्यास यश हे आपलेच असते ,असे ती आवर्जून सांगत आहे. हिमालीच्या या नेत्रदीपक कामगिरीसाठी तीला शुभेच्छा दिल्या आहेत तीची आत्या अलका रामचंद्र म्हात्रे आणि रामचंद्र देवजी म्हात्रे (कवी, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, डोलवी पेण यांनी)

# सेलू येथे (उ बा ठा) शिवसेनेच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची निवड सेलू येथे जिल्हाप्रमुख श्री. रविंद्र धर्मे यांच्या हस्ते करण्यात आली.या कार्यक्रमात किशोर भांडवले यांची शहरप्रमुख, शक्ती बोराडे यांची शहरसंघटक तर माऊली सोळंके यांची उपतालुकाप्रमुख पदी निवड करण्यात आली. या सर्वांना जिल्हाप्रमुख रविंद्र धर्मे यांनी नियुक्तिपत्र प्रदान करून अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील राजकीय व सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख रंजीत (तात्या) गजमल, महिला आघाडीच्या जिल्हा संघटक मंगलआत्या कथले, तालुकाप्रमुख रामेश्वर बहिरट, युवासेना शहरप्रमुख वैभव वैद्य, सोशल मिडिया प्रमुख



गुलाबराव खेडेकर, तालुका संघटक शोभाताई ईक्कर, बाबा भाबट, योगेश कथले तसेच शिवसेना आणि युवासेनेचे अन्य पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या निवडीमुळे सेलू तालुक्यात शिवसेनेच्या संघटनात्मक बळकटीला नवी ऊर्जा मिळाल्याचे कार्यकर्त्यांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# अल्पवयीन मुलीच्या अपहरणप्रकरणी तिन महिलांना पाच वर्षांची सक्तमजुरी

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

**निफाड :** ओझर (निफाड) येथे १३ वर्षीय अल्पवयीन मुलीचे विवाहासाठी विक्रीच्या उद्देशाने अपहरण केल्याप्रकरणी तिन महिलांना दोषी ठरवत निफाडचे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. बी. कोर्हाळे यांनी पाच वर्षांची सक्तमजुरी व प्रत्येकी तीन हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली आहे. दंड न भरल्यास प्रत्येकीस आणखी तीन महिन्यांची सक्तमजुरी भोगावी लागणार आहे.

पिडीत मुलीच्या आईने २३ जुलै २०२५ रोजी ओझर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, तिच्या अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेण्यात आले होते. या प्रकरणी भादंवि कलम ३६३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.तपासादरम्यान हे उघड झाले की प्रियंका देविदास पानपाटील, रत्ना विक्रम कोळी आणि सुरेखा जागो भिल्ल यांनी संगनमताने पिडित मुलीचे अपहरण केले. पुढील तपासात गोविंद मनसारे आणि नानुराम मनसारे यांनी पिडीत मुलीची रवि मनसारे याच्यासोबत विवाहासाठी खरेदी केल्याचे निष्पन्न झाले.या गुन्ह्याचा तपास पोलिस निरीक्षक अशोक रहाटे यांनी पूर्ण करून आरोपपत्र निफाड जिल्हा व सत्र न्यायालयात सादर केले. न्यायालयात सरकार पक्षातर्फे सहायक जिल्हा सरकारी वकिल अँड. आर. एल. कापसे यांनी फिर्यादी, पिडित तसेच तपास अधिकारी अशोक रहाटे यांच्यासह एकूण सात साक्षीदारांची साक्ष नोंदवून प्रभावी युक्तिवाद केला. कोर्ट पॅरवीचे काम पोलीस हवालदार रत्नाकर बागुल यांनी पाहिले. न्यायालयासमोर आलेल्या पुराव्यांच्या आधारे तिनही महिलांनी संगनमताने पिडितेला तिच्या कायदेशीर रखवालीतून पळवून नेल्याचे सिद्ध झाले. त्यानुसार न्यायालयाने तिनही महिलांना दोषी ठरवत भादंवि कलम ३६३ व ३४ अन्वये शिक्षा सुनावली.दरम्यान, या प्रकरणातील इतर तिन संशयितांना पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता देण्यात आली आहे.

# हणेगाव गणातून राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडून ज्योती प्रशांत पाटील इच्छूक

**दैनिक युवक आधार**
**महादेव उप्पे देगलूर वार्ताहर**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होताच विविध गणामध्ये व गटामध्ये राजकीय हालचालीला वेग आले असून पक्षाकडे तिकीटाची मागणी करीत आहेत तर काही जण आपआपल्या मतदार संघात उद्या होणाऱ्या जिल्हा परिषद,पंचायत समिती निवडणूकीचा संभाव्य उमेदवार मीच असल्याचे सांगितले जात आहे.परंतू मागील अनेक वर्षांपासून राष्ट्रीय काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहिलेले देगलूर तालुक्यातील मौजे खुतमापूर येथील प्रशांत दत्तात्रय पाटीत यांनी लोकसभा,विधानसभा



निवडणूक असो किंवा जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणूका असो की,राष्ट्रीय काँग्रेस पक्षातील छोटे मोठे कार्यक्रम असो प्रत्येक वेळी आपले योगदान दिले आहेत व हणेगाव परिसरात राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची भूमिका जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी कधीच कमी पडलेले नाहीत.

त्यामुळे दि.०७ नोव्हेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय काँग्रेस पक्ष नांदेड येथे राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने हणेगाव गणातून पंचायत समिती महिला खुल्या प्रवर्गातून आपल्या सौभाग्यवती ज्योती प्रशांत पाटील यांच्या नावाच्या उमेदवारीची मागणी केली आहे.या मागणीमुळे हणेगाव परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.तर राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे यांना उमेदवारी दिल्यास काँग्रेस पक्षाला निवडणूक सोपी जाईल व सर्व उमेदवाराला याचा फायदा होईल अशी चर्चा सर्वत्र

# करंजाडे येथे मराठी रंगभूमी दिन कार्यक्रम संपन्न



**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

करंजाडे येथे मराठी रंगभूमी दिन कार्यक्रम मायबाप प्रेक्षकांच्या साथीने संपन्न झाला .यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ सिने लेखक- दिग्दर्शक ज्येष्ठ लेखक दिग्दर्शक केदार शिंदे यांचे छोटे बंधू मंदार शिंदे ,रेडिओ प्रतिनिधी आकाशवाणी- मुंबईच्या परिणीता सावंत , रंगभूषा-नेपथ्य दिग्दर्शक झी 24 तास-एस्सेल ग्रुप मुंबईचे नंदादीप तांबे,सुप्रसिद्ध मोटिवेशनल स्पीकर एक उत्तम वक्ते रायगड जिल्हाचे रविकांत भोपी आदी मान्यवर उपस्थित होते . यावेळी उपस्थित मान्यवरांनी मराठी रंगभूमी दिनानिमित्त आपले विचार प्रगट केले . या कार्यक्रमाचे समन्वय आणि आयोजक महेश लाड हे होते . हा कार्यक्रम प्रमुख मान्यवर आणि मायबाप प्रेक्षक यांच्या उपस्थितीत मोठ्या दिमाखात संपन्न झाला .

# डोंबिवली एम.आय.डी.सी.मधील सार्वजनिक शौचालयाची दुर्दशा, प्रशासनाचे मात्र दुर्लक्ष

**दैनिक युवक आधार**
**रमेश राऊत (कल्याण ग्रामिण प्रतिनिधी)**

**डोंबिवली(ठाणे):**कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीत अगोदर सार्वजनिक शौचालयाची कमतरता आहे आणि ज्या ठिकाणी आहेत त्यापैकी बऱ्याच ठिकाणी शौचालयांची अत्यंत वाईट अशी दुर्दशा झालेली आहे.त्यापैकी डोंबिवली एम.आय.डी.सी.मध्ये प्लॉट नंबर डब्ल्यू २६५ जय अंबे कॉर्पोरेशन कंपनीच्या जवळ आणि आशीर्वाद रेस्टॉरंट आणि बार च्या अगदी समोर असलेल्या सार्वजनिक शौचालयाची अत्यंत बिकट अशी अवस्था असल्याचे निदर्शनास आले आहे.

या शौचालयाची साफसफाई होत नसून येथे पाणी सुद्धा उपलब्ध नाही डोंबिवली शहराच्या मधोमध हे शौचालय असल्याने येथे बरेचसे वाहन



चालक तसेच पादचारी या शौचालयाचा वापर करताना दिसून येते,येथील स्थानिक आमदार आणि प्रशासनाने त्वरित लक्ष घालून या शौचालयाची दुरुस्ती करावी अशी मागणी येथून ये-जा करणारे नागरिक करीत आहे.पाणी उपलब्ध नसल्याने आणि वापर सुरू असल्याने येथील आजूबाजूच्या परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली आहे.

या शौचालयाला लागून काही अंतरावर मंदिर सुद्धा आहे या मंदिरात येणाऱ्या भाविकांना सुद्धा या दुर्गंधीचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

# उदय भाऊ मुंडकर यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी लातूर जिल्हा उपाध्यक्षपदी निवड

**दैनिक युवक आधार**
**उदगीर प्रतिनिधी (बालाजी तेलंगे)**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या लातूर जिल्हा उपाध्यक्षपदी उदय भाऊ मुंडकर यांच्या निवडीची घोषणा होताच कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सामाजिक कार्य, संघटन कौशल्य आणि पक्षनिष्ठा याबद्दल प्रसिद्ध असलेल्या उदय मुंडकर यांच्या निवडीचे उदगीर शहरात व तालुक्यात सर्वत्र स्वागत होत आहे.

सामाजिक कार्यकर्ते सतिश पाटील माणकीकर, माधवराव पाटील शेळगे येणकीकर, रामदास पाटील गोजेगावकर, डि.एस. बिरादार सर, अशोक कांबळे, अंकुश बिरादार तसेच सर्व मित्र मंडळाच्या वतीने उदय भाऊ मुंडकर यांच्या निवडीबद्दल



सत्कार करण्यात आला. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले की, "उदय भाऊंच्या नेतृत्वामुळे लातूर जिल्ह्यात व उदगीर तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अधिक बळकट होणार असून, सामान्य कार्यकर्त्यांना न्याय मिळेल." या निवडीमुळे होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, पुढील काळात मुंडकर यांच्या नेतृत्वाखाली पक्ष अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# वंदे मातरम" – राष्ट्रभावनेचा अखंड स्तोत्रगान: प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे

**दैनिक युवक आधार**
**शिरूर कासार प्रतिनिधी**

आज देशभरात “वंदे मातरम” या राष्ट्रभावनेला अजरामर करणाऱ्या गीताचा गौरव करण्यात आला. भारतमातेच्या चरणी समर्पण आणि देशप्रेमाचे प्रतीक ठरलेले हे गीत बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी १८७० च्या दशकात आपल्या ‘आनंदमठ’ या कादंबरीसाठी रचले होते. त्यातील “वंदे मातरम” या दोन शब्दांनी स्वातंत्र्यसंग्रामाच्या काळात असंख्य भारतीयांच्या हृदयात देशभक्तीचा जाज्वल्य ज्वालामुखी पेटवला. असे प्रतिपादन कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे यांनी केले. याप्रसंगी व्यासपीठावर उप प्राचार्य डॉ. संजय तुपे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.अशोक घोळवे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे केंद्रसंयोजक डॉ श्याम सानप,कर्मचारी सचिव डॉ.नवनाथ पवळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे म्हणाले की,हे गीत मातृभूमीला देवीच्या रूपात वंदन करते हिरवीगार शेते, सुवर्णशस्य शेतमाळे, गंधविहारी वनराजी, पवित्र नद्या आणि शांत वारा या सर्वांमधून भारतमातेचे सौंदर्य प्रकट होते. यामध्ये मातृभूमीला शक्ती, ज्ञान आणि संपत्तीची अधिष्ठात्री म्हणून गौरवण्यात आले आहे.भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या काळात “वंदे मातरम” हे घोषवाक्यच क्रांतीकारकांची प्रेरणाशक्ती ठरले. लाल, बाल, पाल पासून ते महात्मा गांधी यांच्यापर्यंत प्रत्येक नेत्याने या गीतातील भावनेला राष्ट्रीय ऐक्याचे प्रतीक मानले. आजही शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये “वंदे मातरम”चा घोष होताच वातावरण भारावून जाते. देशाच्या सांस्कृतिक ओळखीचा अविभाज्य भाग ठरलेले हे गीत आजही प्रत्येक भारतीयाच्या ओठांवर राष्ट्रप्रेमाची भावना जागवते. असेही ते शेवटी म्हणाले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमात घ्यावी कार्यक्रमाधिकारी डॉ अशोक घोळवे यांनी केले तर उपस्थित मान्यवरांच्या आभार डॉ नवनाथ पवळे यांनी मानले या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## मालेगावच्या ठाणेदार पदी राजेश खेर्डे रुजु ठाणेदार संजय चौधरी यांची वाशिम येथे बदली..

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**



**मालेगाव:-** पोलीस स्टेशन चे ठाणेदार संजय चौधरी यांची वाशिम येथे जिल्हा विशेष शाखेत बदली करण्यात आली असून त्यांच्या जागेवर वाशिम वरून राजेश खेर्डे हे ५ नोव्हेंबर रोजी मालेगाव ठाणेदार म्हणून रुजू झाले आहेत.ठाणेदार संजय चौधरी यांचे कार्यकाळात मालेगाव शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील असून गुन्हेगारी प्रकृती मोठ्या प्रमाणात कमी झाली होती.सर्वधर्मीय धार्मिक मिरवणुका , सण ,उत्सव हे शांततेत पार पाडण्यासाठी त्यांनी मोलाची कामगिरी बजावली होती.

त्यांची बदली वाशिम येथे जिल्हा विशेष शाखेमध्ये झाली असून त्यांच्या जागी जिल्हा विशेष शाखेमध्येच कार्यरत असलेले पीआय राजेश खेर्डे दि.५ नोव्हेंबर रोजी मालेगाव ठाणेदार पदी रुजू झाले आहेत. ठाणेदार खेर्डे यांना मालेगांव शहरातील तसेच ग्रामीण भागातील गुन्हेगारी प्रवृत्ती,तसेच अवैध धंदे,अवैध दारू, चिडी मारी बंद करून शांतता व सुव्यवस्था राखण्याचे आव्हान त्यांचे समोर आहे. ते त्यांच्या पदाला पूर्णपणे न्याय देतील अशी अपेक्षा सर्वसामान्य नागरिक व्यक्त करीत आहेत.

## पनवेल महापालिकेची २२४ झाडांवर कुऱ्हाड ?

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर ) :** पनवेल महानगरपालिका हरित पनवेलचे उद्दिष्ट गाठण्यासाठी यंदाच्या वर्षात सव्वा लाख वृक्ष लागवड करणार आहे. परंतु दूसरीकडे सिडकोच्या संयुक्त विद्यमाने तळोजा येथील घोटचाळ गावाशेजारी सुरू असलेल्या नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या विस्तारामध्ये अडचण ठरणारी ७ ते १० वर्षे वयाची २२४ झाडांची तोड करण्याचा प्रस्ताव पुढे आल्यामुळे पर्यावरण प्रेमींमध्ये चिंतेचे वातावरण आहे.या वृक्षतोडी बद्दल नागरिकांना माहिती मिळावी यासाठी महापालिका प्रशासनाने नागरिकांच्या हरकती मागविण्याची जाहीर नोटीस बुधवारी प्रसिद्ध केली आहे. या झाडांमध्ये सुबाभूळ, जांभूळ, करंज, काजू, साग, निम, कदंब, सोनमोहर, आंबा, गुलमोहर, बहावा यांसारख्या विविध प्रजातींचा समावेश आहे. ही झाडे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या विस्तारासाठी आवश्यक असलेल्या अतिरिक्त भूखंडाभोवती परिधीय मार्ग आणि जलनिस्सारणासाठी करावयाच्या बांधकामासाठी अडथळा ठरत आहेत. नागरिकांनी या झाडांच्या तोडणीसंबंधी हरकती किंवा सूचना १२ नोव्हेंबरपर्यंत लेखी स्वरूपात सादर कराव्यात, असे आवाहन महापालिकेच्या उद्यान विभाग आणि वृक्ष प्राधिकरणाने केले आहे. मुदतीत हरकती न आल्यास वृक्ष प्राधिकरण झाडतोडीस सशर्त परवानगी देण्याची कार्यवाही करणार असल्याचे स्पष्ट नमूद केले आहे.

## महेश मेथे पाटील: लोकसेवेचा वारसा जपणारे, पंचायत समितीसाठी सक्षम आणि अभ्यासू नेतृत्व!

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**विंचूर :-**गोंदेगाव येथील सुशिक्षित, अभ्यासू आणि कार्यतत्पर व्यक्तिमत्त्व, महेश चांगदेवराव मेथे पाटील, यांच्या राजकीय प्रवेशाची जोरदार चर्चा सध्या नैताळे-डोंगरगाव गणामध्ये (पूर्वीचा नैताळे आणि आताचा डोंगरगाव गण) सुरू आहे. लोकसेवेचा भक्कम वारसा आणि ग्रामपंचायतीमधील त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीमुळे, ते पंचायत समिती सदस्यपदाचे एक प्रबळ आणि लोकाभिमुख उमेदवार म्हणून लोकांच्या मनावर आपली छाप पाडत आहेत.

**शिक्षण आणि अनुभव: लोकसेवेचा भक्कम पाया**

महेश मेथे पाटील यांनी BCS (बॅचलर ऑफ कॉम्प्युटर सायन्स), D.PHARM (डिप्लोमा इन फार्मसी) आणि ND पर्यंत शिक्षण घेतले आहे. उच्च शिक्षण आणि विविध विषयांचे ज्ञान यामुळे ते राजकारणातील एक अभ्यासू आणि हुशार व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. व्यवसायाच्या माध्यमातूनही ते 'स्मृती मेडिकल ॲण्ड जनरल स्टोअर्स, भरवस फाटा' आणि 'स्वरा मेडिकल ॲण्ड जनरल स्टोअर्स, गोंदेगाव' येथे आरोग्य सेवा देत आहेत. विशेष म्हणजे, ते स्वाक्षरी विश्लेषक (signature Analyst) देखील आहेत, जी



त्यांची सूक्ष्म निरीक्षण क्षमता दर्शवते.

**लोकसेवेचा वारसा: पिढ्यानपिढ्या समाजकारण**

मेथे कुटुंबाला सार्वजनिक जीवनाचा मोठा वारसा लाभला आहे. त्यांचे वडील १० वर्षे उपसरपंच राहिले आहेत, तर त्यांची आई माजी ग्रामपंचायत सदस्य आणि प्रशासक म्हणून कार्यरत होत्या. महेश मेथे पाटील यांनीही माजी ग्रामपंचायत सदस्य म्हणून काम केले आहे. लोकसेवेची ही परंपरा जपत त्यांनी स्वतःच्या कामातून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

**ग्रामपंचायत कार्यकाळातील ऐतिहासिक कामगिरी**

महेश मेथे पाटील यांचा ग्रामपंचायत कार्यकाळ गोंदेगावसाठी ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण ठरला. त्यांच्या नेतृत्वाखालील काही प्रमुख कामे:जनतेच्या हक्काचा रस्ता: १०० वर्षांपासून गावातील नागरिकांना मुख्य रस्त्यापासून गावापर्यंत जाण्यासाठी रस्ता नव्हता. कोर्टात केस सुरू असतानाही, त्यांनी सामंजस्यातून हा रस्ता मिळवला. हा निर्णय त्यांच्या प्रगल्भ नेतृत्व आणि प्रशासकीय कौशल्याचे प्रतीक आहे.

विकास निधीचा नवा अध्याय: ग्रामपंचायतीच्या स्थापनेपासून गावाला कधीही खासदार निधी मिळालेला नव्हता. त्यांच्या प्रयत्नांनी तो प्रथमच गावात आणला, ज्यामुळे विकासाला नवी गती मिळाली.

**मूलभूत सुविधांचे जाळे:** गावात बाजार भरवण्यापासून ते कॉंक्रीटीकरण, सभागृह, गटारी आणि गावाची स्मशानभूमी यांसारख्या अत्यावश्यक कामांमध्ये त्यांनी मोठे योगदान दिले.

'स्वच्छ प्रतिमा' आणि 'अभ्यासू नेतृत्व' ही काळाची गरज!

सध्याच्या राजकीय परिस्थितीत, महेश मेथे पाटील यांच्यासारखी स्वच्छ प्रतिमेची आणि अभ्यासू माणसे राजकारणात असणे ही काळाची गरज आहे, असे बहुतांश मतदार ठामपणे बोलत आहेत.

**त्यांची बलस्थाने:**

उत्कृष्ट प्रशासकीय ज्ञान: प्रशासकीय कामकाजाचा त्यांचा चांगला अभ्यास आहे.

निधी उभारण्याचे कौशल्य: गणासाठी कामे करताना कुठून निधी उभारावा आणि प्रभावी पाठपुरावा कसा करावा याचे चांगले ज्ञान आणि कौशल्य त्यांच्याकडे आहे.

मितभाषी आणि संवेदनशील: ते मितभाषी असले तरी प्रत्येक व्यक्तीच्या सुख-दुःखात सहभागी होतात, ज्यामुळे त्यांचे लोकांसोबतचे नाते अधिक दृढ आहे.

सामाजिक योगदान: सामाजिक क्षेत्रात त्यांचे विशेष आणि अविरत योगदान आहे.

**मतदारांचा स्पष्ट कौल: 'गावातीलच उमेदवार हवा'**

गोंदेगावची मतदारसंख्या डोंगरगाव गणात मोठी असतानाही, आजपर्यंत सखाहरी कांगणे हे एकमेव पंचायत समितीचे सदस्य झाले होते. आता गावातील मतदारांचा स्पष्ट सूर आहे की, त्यांच्याच गावातील सक्षम आणि कार्यक्षम उमेदवार पंचायत समितीवर निवडून जावा. महेश मेथे पाटील हे या अपेक्षांवर पूर्णपणे उतरणारे उमेदवार आहेत, ज्यांच्याकडे जनतेची सेवा करण्याची तीव्र इच्छा आणि प्रशासकीय क्षमता दोन्ही आहेत.

लोकांच्या मनातील नेता म्हणून, महेश मेथे पाटील यांचे पंचायत समितीच्या राजकारणात पदार्पण, या संपूर्ण गणासाठी एका नव्या आणि विकासाभिमुख पर्वाची सुरुवात ठरू शकते. अंतिम निर्णय जरी त्यांचा स्वतःचा असला तरी, जनतेने त्यांच्यावर दाखवलेला विश्वास आणि त्यांच्या कार्याची दखल निश्चितच प्रेरणादायी आहे.

## संपूर्ण वंजारी उत्कर्ष समाज मंडळातर्फे मुंबई येथे वधू वर सूचक मेळाव्याचे भव्य आयोजन

**दैनिक युवक आधार**
**उमाकांत पानसरे** : मंडळी , असं म्हणतात लग्नाच्या गाठी या स्वर्गातच बांधल्या जातात आजच्या संगणकाच्या आधुनिक युगात वंजारी समाजातील अनेक तरुण आणि तरुणीनीं विविध क्षेत्रात शिक्षणाच्या जोरावर आपले अस्तित्व प्रस्थापित करून ठेवले आहेत करिअरच्या या प्रवासात त्यांना हव्या असलेल्या आयुष्याच्या जोडीदाराच्या शोधकार्यात मदत म्हणून संपूर्ण वंजारी उत्कर्ष समाज मंडळातर्फे अध्यक्ष श्री मारुती उगले हा वधू वर सूचक मेळावा ' रविवार दिनांक 9 नोव्हेंबर 2025 रोजी सकाळी दहा वाजता ऋषी मेहता हॉल मुंबई सेंट्रल ताडदेव आर.टी.ओ ताडदेव येथे आयोजित केला आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे निवृत्त सहा. आयुक्त श्री. रणजीत ढाकणे , ज्येष्ठ समाजसेवक श्री सुभाष खैर , बीडचे सुप्रसिद्ध पत्रकार श्री.गणेश खाडे या प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत सदर वधू वर सूचक मेळावा अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडणार आहे. तरी संपूर्ण वंजारी उत्कर्ष समाज मंडळातील सर्व पदाधिकाऱ्यांच्या वतीने मंडळाचे अध्यक्ष श्री मारुती उगले यांनी या वधू वर सूचक मेळाव्यास विवाह इच्छुक तरुण-तरुणींनी उपस्थित राहून घेण्यासाठी आवाहन केले आहे. तसेच घटस्फोटीत विवाह इच्छुक उमेदवारांना सुद्धा या ठिकाणी लाभ घेता येणार आहे. वधू वर उमेदवारांना पुढे दिल्याप्रमाणे http//: vanjarimandal. in या वेबसाईटला लॉगिन करून आपले नाव नोंदवता येईल. कार्यक्रमाची शोभा वाढवण्यासाठी जास्तीत जास्त संख्येने वधू वर उमेदवार आणि त्यांच्या पालकांनी उपस्थित राहण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे. पत्रिकेत दिल्याप्रमाणे मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचे मोबाईल क्रमांक उपलब्ध असतील असे अध्यक्ष श्री मारुती उगले यांनी सांगितल आहे.




## केंद्रीय पथकाचा पाटोदा तालुक्यात पाहणी दौरा नुसता फार्स..?; शेतकऱ्यांत प्रचंड नाराजीचा सूर

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -** अतिवृष्टीने बाधित झालेल्या जमिनीची पाहणी करण्यासाठी बुधवार ५ नोव्हेंबर रोजी अतिवृष्टीतील बाधित क्षेत्राची पाहणी करण्यासाठी केंद्रीय समितीचे पथक पाटोदा तालुक्यात दाखल झाले. या मुळे पाटोदा तालुक्यातील सर्वाधिक बाधित मांजरा काठ, नफरवाडी, पारगाव घुमरा, अनपटवाडी येथील शेतकऱ्यांनी पथक नुकसानीची पाहणी करेल अशी अपेक्षा होती. परंतु पथकाने खऱ्या नुकसानग्रस्त क्षेत्राकडे दुर्लक्ष करीत केवळ कारेगाव येथील शिवाराची पाहणी केली. या मुळे शेतकऱ्यांचा अपेक्षाभंग झाला असुन केंद्रीय पथकाने केवळ पाहणी करण्याचा फार्स केला असल्याने शेतकऱ्यांमध्ये मात्र प्रचंड नाराजी व्यक्त केली जात आहे. पाटोदा तालुक्यात २० ते २४ सप्टेंबर दरम्यान तीन वेळा झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे पिक आणि शेतजमिनीचे अतोनात नुकसान झाले. कापूस, सोयाबीन सह इतर सर्व पिके १००% बाधित झाले तर जमिनी पावसाच्या पाण्यात खरडून गेल्या खरिप हंगामातील हातातोंडाशी आलेला घास हिरावून गेलेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून अतिवृष्टीतील नुकसान भरपाईची मोठी अपेक्षा आहे. जिल्हा प्रशासनाच्या



अहवालानुसार पाटोदा तालुक्यातील ५३९.१२ हेक्टर क्षेत्र खरडून गेली असुन जनावरे वाहुन गेली असल्याचे नोंद असुन वाहुन गेलेल्या जनावरा बाबत आणखीन साधा शासन निर्णय नाही मग मदत कधी भेटणार या बाबतीत आणखीन संभ्रम आहे. या बाबत भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप म्हणाले की केंद्रीय पाहणी पथकाचा पाहणी दौरा म्हणजे केवळ भपंक पणा आहे. अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे झालेल्या मोठ्या नुकसानीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय पथक बुधवार दि.५ नोव्हेंबर २०२५ रोजी बीड जिल्ह्यात दाखल झाले. पथकात एसव्हीएसपी शर्मा, विशाल पांडे यांचा समावेश होता. यांचे सोबत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पाटोदा तालुक्यातील कारेगाव येथे भेट देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला व झालेल्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली. या वेळी मौजे कारेगाव येथील बाधित शेतकरी ८६९,बाधित क्षेत्र ९९८ हेक्टर, अपलोड केलेली संख्या ८०५,निधी वितरण ८,४८,३०००, घर पडझड १८ ची माहिती तसेच जमीन खरडून जाणे बाधित शेतकरी १६७ बाधित क्षेत्र २०.१२ हे.आर. त्याची रक्कम रुपये ८,४६२७० तसेच विहिरीमध्ये गाळ जाणे, विहीर बुजने बाधित शेतकरी ४८ या बाबत शेतकऱ्यांसोबत संवाद साधून जिल्हाधिकारी बीड यांनी माहिती सांगितली तसेच शेती, फळबागा, रस्ते, पूल, वीजपुरवठा आणि घरांचे मोठे नुकसान झाल्याचे पथकाने नोंदवले. पाहणी दरम्यान जिल्हा परिषद मुख्य अधिकारी जितीन रहेमान, जिल्हा कृषी अधिकारी सुभाष साळवे, उपविभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख मॅडम, तहसीलदार डी.बी.निलावाड, तालुका कृषी अधिकारी ओंकार शेळके, पाटोदा गटविकास अधिकारी सानप, पाटोदा मंडळ अधिकारी विभाग अंमळनेर, ग्राम महसूल अधिकारी सौ.दिपालीताई लांडगे (भालेकर) नाळवंडी ग्रा.म.अ.डोंगरकिन्ही बाळू बडे, ग्रा.म.अ.अंमळनेर येवले, ग्रा.म.अ.कोतन मस्के यांच्या सह सर्व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## पनवेल शहर पोलिसांच्या कोम्बिंग कारवाई दरम्यान सराईत गुन्हेगार ताब्यात

**पनवेल :** पनवेल शहर पोलिसांच्या कोम्बिंग कारवाई दरम्यान एका सराईत गुन्हेगारास पनवेल रेल्वेस्टेशन जवळील नवनाथ मंदिर मालधक्का झोपडपट्टी परिसरातून ताब्यात घेण्यात आले आहे . आरोपी इजाज शेख उर्फ अज्जू याने त्या परिसरात चहा टपरीवर चहा पिण्याकरिता थांबलेले महादेव देवकांबळे (वय ४५ ) यांच्या कडील ओपो कंपनीचा १२,५०० /- रुपये किमतीचा मोबाईल फोन जबरदस्तीने ओढून चोरून घेऊन गेला होता व चाकूचा धाक दाखविला होता . याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने त्या परिसरात कोम्बिंग कारवाई करून आरोपीला ताब्यात घेतले आहे .

## हायड्रो गांजाच्या तस्करीत आणखी दोघे अटकेत

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर ) :** हायड्रो गांजाची तस्करी करणाऱ्या केयूर जयेश गोगरी या तरुणाला अटक करण्यात आल्यानंतर या तस्करीत सहभागी असलेल्या आणखी दोन तरुणांना नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली आहे. मोहम्मद आमान सलीम शेख (वय २०) व हित मुकेश पटेल (वय २२) अशी या दोघांची नावे आहेत. हे दोघेही केयूर गोगरी याच्याकडून हायड्रो गांजा घेऊन ते खारघरमधील मुलांना विक्री करत असल्याचे तपासात आढळून आले आहे.

खारघरमध्ये राहणारा केयूर गोगरी हा राहत्या घरातून अमली पदार्थांची विक्री करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर अमली पदार्थ विरोधी पथकाने ३० ऑक्टोबर रोजी खारघर सेक्टर-१९ मधील शिवसाई बिल्डिंगवर छापा मारला होता. त्या वेळी केयूर गोगरी याच्या कारमध्ये ८०० मिलीग्रॅम वजनाचा हायड्रो गांजा सापडला होता. अमली पदार्थ विरोधी पथकाने केयूर गोगरी याला एनडीपीएस कलमाखाली अटक केली होती. त्यानंतर पोलिसांनी त्याच्याकडे अधिक केयूर गोगरी याच्या चौकशीत त्याने भांडुप येथे राहणाऱ्या शारीख याच्याकडून हायड्रो गांजा आणून त्याची विक्री करत असल्याचे कबूल केले आहे. शरीख हा थायलंड येथून छुप्या मार्गाने हायड्रो गांजा भारतात आणून त्याची आपल्या हस्तकांमार्फत विक्री करत असल्याचे तपासात आढळून आले आहे. त्यामुळे अमली पदार्थ विरोधी पथकाने शरीख व नोमान या दोघांचा शोध सुरू केला आहे. चौकशी केली असता, तो सदरचा हायड्रो गांजा भांडुप येथे राहणारा त्याचा मित्र शारीख व उलवे येथे राहणारा नोमान याच्याकडून आणत असल्याची कबुली दिली. तसेच कळंबोली येथे राहणारा मोहम्मद आमान सलीम शेख व खारघरमध्ये राहणारा हित मुकेश पटेल हे दोघे केयूर गोगरी याच्याकडून हायड्रो गांजा घेऊन ते खारघरमधील मुलांना विकत असल्याचे देखील त्याने सांगितले. त्यानुसार मोहम्मद अमान शेख व हित पटेल या दोघांना या प्रकरणात अटक करण्यात आल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदिप निगडे यांनी दिली.

## शेतकऱ्यांना देवाभाऊ पावले :- आमदार सुरेश धस, शेतकऱ्यांना रब्बीच्या पेरणीसाठी हेक्टरी १० हजार

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -** महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील पेरणीसाठी हेक्टरी १० हजार रुपयांची मदत जाहीर केली असून बीड जिल्ह्यातील तब्बल ७ लाख ३७६१० शेतकऱ्यांना ७०८ कोटी ८ लाख ५७ हजार रुपयांचा दिलासा मिळणार आहे. राज्याच्या महसूल विभागाने ४ नोव्हेंबर रोजी या संदर्भात शासन निर्णय जारी केला आहे. या निर्णयानंतर आमदार सुरेश आण्णा धस यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले की शेतकऱ्यांना देवाभाऊ पावले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचे तारणहार ठरले आहेत. या वर्षीच्या खरीप हंगामात बीड सह संपूर्ण मराठवाड्यात अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. खरीपातील जवळपास सर्वच पिके उध्वस्त झाल्याने शेतकरी संकटात सापडला होता. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या रब्बी पेरणीसाठी बियाणे व खत खरेदीसाठी थेट आर्थिक मदत देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार बीड जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्येकी हेक्टरी १० हजार रुपये थेट बँकेत जमा होणार आहेत. या निर्णयामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर दिलासा आणि समाधान दिसून येत असून रब्बी पेरणीसाठी मोठा हातभार लागणार आहे.

## खोपोली नगरपरिषदेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

**दैनिक युवक आधार**
**खोपोली /वार्ताहर :** खोपोली नगरपरिषदेच्या निवडणुकीचा अधिकृत कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला असून, थेट नगराध्यक्ष पदासह १५ प्रभागांमध्ये मतदान होणार आहे. निवडणुकीसाठी आवश्यक सर्व प्रक्रिया नगरपरिषद कार्यालयात पार पडणार आहे. या निवडणुकीसाठी उपविभागीय अधिकारी कर्जत प्रकाश सपकाळ यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर तहसीलदार खालापूर अभय चव्हाण आणि नगरपरिषद मुख्याधिकारी पंकज पाटील पवार हे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहणार



आहेत. नामनिर्देशनपत्र १०।नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत भरता येणार असून,१७ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज स्वीकारले जातील. १६ नोव्हेंबर हा रविवार असल्याने त्या दिवशी नामनिर्देशनपत्र स्वीकारले जाणार नाहीत.नामनिर्देशनपत्रांची छाननी १८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता होईल, तर अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत २१ नोव्हेंबर दुपारी ३ वाजेपर्यंत आहे. अपील प्रक्रियेचा कालावधी २१ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर असाठरविण्यात आला आहे. २६ नोव्हेंबर रोजी निवडणुकीसाठी अंतिम उमेदवारांची यादीजाहीर होईल व चिन्हे वाटप केली जातील. आवश्यक असल्यास मतदान २ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत घेण्यात येईल. मतमोजणी ३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजल्यापासून सेंट मेरी स्कूल,चिंचवली डीपी रोड, खोपोली येथे होणारअसून निकाल १० डिसेंबरपूर्वी महाराष्ट्रशासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

## धनादेश अनादार प्रकरणी आरोपीस शिक्षा

**दैनिक युवक आधार सेलू तालुका प्रतिनिधी (ग्रामीण) विठ्ठल राऊत**

धनादेश अनादर बाबत शेख नासेर शेख नबी यांस सर न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग सेलू चे न्यायाधीश श्री वैभव आर. गटकळ यांनी आरोपीस धनादेश अनादर बाबत एका महिन्याचा कारावास तसेच धनादेशाच्या रकमेच्या दुप्पट रक्कम एक लाख सोळा हजार दोनशे रुपये तसेच प्रकरणाचा खर्च फिर्यादी बँकेस दहा हजार रुपये एका महिन्यात देण्याचा आदेश पारित केला .

याबाबत हकीकत अशी की, सेलू येथील देवगिरी नागरी सहकारी बँक मर्यादित औरंगाबाद शाखा, सेलू येथे आरोपी शेख नासर शेख नबी यांनी बँकेची रक्कम परतफेड न केल्याने बँकेचे वसूली साठी पाठपुरावा केल्यानंतर आरोपी शेख नासर शेख नबी यांनी बाकी रकमेपैकी अठावन्न हजार दोनशे रुपयांचा धनादेश बँकेच्या हक्कात दिला. सदरील धनादेश बँकेने वटविण्यासाठी दिला असता आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम नसल्यामुळे उपरोक्त धनादेश अनादर झाला .त्यानंतर बँकेच्या वकिलामार्फत कायदेशीरपणे रक्कम मिळण्यासाठी आरोपीस नोटीस देण्यात आली .नोटीस दिल्यानंतरही मुदतीत रक्कम न दिल्यामुळे बँकेतर्फे धनादेश अनारदाराबाबत प्रकरण न्यायदंडा धिकारी प्रथम वर्ग सेलू येथे १३८ निगोशिएरबल इन्स्ट्रुमेंट कायद्यातनन्वे प्रकरण दाखल करण्यात आले होते. त्यानंतर वकिलाचा युक्तिवाद ग्राह्य धरून सह न्याय दंडा धिकारी प्रथम वर्ग सेलूचे न्यायाधीश श्री वैभव आर. गटकळ यांनी आरोपीस धनादेश अनादर झाल्याबद्दल प्रकरण सिद्ध झाल्यामुळे दोषी ठरवून एक महिन्याचा कारावासाची शिक्षा तसेच धनादेशच्या दुप्पट रक्कम एक लाख सोळा हजार दोनशे रुपये नुकसान भरपाई फिर्यादी बँकेस एक महिन्यात देण्याचा आदेश पारित केला तसेच जर उपरोक्त रक्कम एक महिन्यात न दिल्यास एक महिन्याच्या कारावास तसेच फिर्यादीने दहा हजार रुपये फिर्यादी बँकेस अर्जाच्या खर्चापोटी एक महिन्यात देण्याचा आदेश दिनांक १६.१०.२५ रोजी पारित केला. फिर्यादी देवगिरी नागरी बँक औरंगाबाद शाखा सेलूच्या वतीने अँड. एल.एच .खोना यांनी बँकेतर्फे बाजू मांडली.

## मोटारसायकलची चोरी

**पनवेल :** पनवेल रेल्वेस्टेशन येथील पार्किंग जवळील साई मंदिराच्या बाजूला उभी करून ठेवलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे . रेवणनाथ पालवे यांनी त्यांची ३० हजार रुपये किमतीची बजाज कंपनीची एमएच १६ एसी ४७७१ डिस्कव्हर मोटारसायकल निळया काळया रंगाची ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे .

## बांधकाम साहित्याची चोरी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर ) :** अनेक वर्षांपासून बांधकाम सुरू असलेल्या खारघर येथील महापौर निवासाच्या इमारतीच्या कामासाठी मागवलेल्या वीज साहित्याची चोरी झाली आहे. याबाबत खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. या घटनेत एक लाख रुपयांची केबल व इतर साहित्य चोरण्यात आले आहे. खारघर येथील सेक्टर २१ येथील भूखंड क्रमांक १५१ येथे पनवेल महापालिका महापौर निवास बांधत आहे. या महापौर निवासाचे काम अंतिम टप्प्यात आहे. २८ ते ३१ ऑक्टोबर या दरम्यान ही चोरी झाल्याची नोंद गरजितसिंग रहलोवालिया यांनी दिली आहे.

# तहसीलदार कार्यालय परिसरात स्वच्छतेचा बोजवारा – नागरिकांचा संताप”

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी -अनिकेत मोहित**

श्रीवर्धन तहसीलदार कार्यालय परिसरात सध्या स्वच्छतेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे. कार्यालय परिसरातील स्वच्छता गृहांची दयनीय अवस्था पाहून प्रशासनाच्या निष्काळजीपणावर बोट ठेवले जात आहे.पाण्याची अपुरी सोय आणि साफसफाईचा अभाव यामुळे स्वच्छता गृहांतून येणाऱ्या दुर्गंधीने परिसर असह्य झाला आहे. दररोज कामानिमित्त कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना तसेच महिलांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.विशेष म्हणजे, महिलांसाठी असलेले सार्वजनिक स्वच्छता गृह बंद असल्याने त्यांना




प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. तर दुसरीकडे महिला कर्मचाऱ्यांसाठी राखीव असलेले स्वच्छता गृह मात्र सर्व सुविधा आणि स्वच्छतेसह वापरात असल्याचे चित्र दिसत आहे. या असमानतेबद्दल नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.कार्यालय परिसरात कचऱ्याचे ढीग, धुळीने भरलेले रस्ते आणि नियमित स्वच्छतेचा अभाव हेही चित्र अधिकच बिकट बनवत आहेत. नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीने लक्ष घालून परिसर स्वच्छ करण्याची, तसेच सर्वांसाठी समान सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

# डिजिटल मुंबई वार्ता आयोजित सार्वजनिक गणेशोत्सव आणि नवरात्र उत्सव संयुक्त पारितोषिक वितरण सोहळा २०२५ उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी :** डिजिटल मुंबई वार्ता द्वारा आयोजित सार्वजनिक गणेशोत्सव आणि सार्वजनिक नवरात्र उत्सव २०२५ च्या संयुक्त पारितोषिक वितरण सोहळा रविवार, २ नोव्हेंबर रोजी कन्नमवार नगरातील विकास हायस्कूलमध्ये मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्यात विविध मंडळांना उत्कृष्ट देखावा, सुबक मूर्ती आणि नवरात्र उत्सवासाठी पारितोषिके वितरित करण्यात आली.कार्यक्रमाचे संयोजन डिजिटल वार्ताच्या संपादिका सहिष्णुता कांबळे व कार्यकारी संपादक शरद कांबळे यांनी केले होते.कार्यक्रमाचे विशेष निमंत्रित म्हणून विद्याविकास एज्युकेशन सोसायटीचे डेप्युटी सीईओ डॉ.



अनघा राऊत, माजी नगरसेवक उपेंद्र सावंत, अभय शिक्षण केंद्र संचालक श्री तुषार गायकवाड, श्री सत्यवान भास्कर (बीजेपी महाराष्ट्र राज्य परिषद अध्यक्ष), ॲड. दीपक पाईकराव,ॲड. राजेंद्र सिंग,श्री राजेंद्र नवघणे (ईशान्य मुंबई सरचिटणीस), श्री राहुल वाघमारे (ब्लॉक अध्यक्ष विक्रोळी कॉंग्रेस विधानसभा), श्री प्रथमेश राणे (माजी ११८ वॉर्ड अध्यक्ष भाजपा ), समाजसेवक श्री सुरेश वंगा,ॲड. प्रांजल जाधव (जनहित कक्ष विधी विभाग मनसे उपाध्यक्ष) आणि ॲड. ज्योती दुराफे (महिला मोर्चा सचिव बीजेपी), दिशा वेल्फेअर ग्रुप सामाजिक संस्थेचे दिनेश बैरीशेट्टी आदी मान्यवर उपस्थित होते.ऑनलाइन गणेशोत्सव

पारितोषिके : सर्वोत्कृष्ट मंडळ : वरळी पोलीस कॅम्प पोलिसांचा राजा (सौजन्य : खासदार वर्षाताई गायकवाड).

उत्कृष्ट देखावा प्रथम: परेरावाडी साकीनाका (सौजन्य : उपेंद्र सावंत). उत्कृष्ट देखावा द्वितीय : कला मित्र मंडळ विक्रोळी वेस्ट (सौजन्य : एडवोकेट दीपक पाईकराव), सुबक मूर्ती श्रेणी :

प्रथम : मुलुंड चा राजा (सौजन्य : अगत्ये इन्फ्रा डेव्हलपर).

द्वितीय : विक्रोळी राजा (सौजन्य : राहुल वाघमारे).

तृतीय : संतोषी माता पथक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ पाच नंबरचा राजा (सौजन्य : राजेंद्र नवघणे),उत्तेजनार्थ : जय मा भवानी मित्र मंडळ विक्रोळीची आई भवानी (सौजन्य : डिजिटल मुंबई वार्ता),सार्वजनिक नवरात्र मंडळ पारितोषिके :

प्रथम : विक्रोळी ची दुर्गा माता (सौजन्य : ॲड. संजय राजेंद्र सिंग),द्वितीय : आई शिवाई विक्रोळी मंडळ (सौजन्य : संजय राजेंद्र सिंग),तृतीय : अमर मित्र मंडळ जय मा अंबे धाम (सौजन्य : ॲड. प्रांजल जाधव).

याशिवाय, विशेष पारितोषिक श्री विजय गणेशोत्सव मित्र मंडळ टागोर नगर ग्रुप क्रमांक ४ ला देण्यात आले (सौजन्य : स्वर्गीय सौ. शोभा खानविलकर यांच्या स्मृत्यर्थ) हा सोहळा मुंबईतील सांस्कृतिक आणि सामाजिक उत्सवांच्या जपणुकीचे प्रतीक ठरला असून, सर्व विजेते आणि आयोजकांचे अभिनंदन करण्यात येत आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विवेक गायकवाड यांनी केले होते.

# आचारसंहितेचे सर्वांनी पालन करा निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार सौ मंजूशा भगत यांचे आहवान

**दैनिक युवक आधार**
**उमरी /प्रतिनिधी रूपेशकुमार ग.श्रीरामवार**

उमरी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होताच तालुक्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे "आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी होईल, याची दक्षता सर्वांनी घ्यावी. कोणताही अनुचित प्रकार सहन केला जाणार नाही," असा कडक इशारा निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार सौ.मंजूशा भगत यांनी दिला.उमरी तहसिल कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत नगर परिषदेचे मुख्याधिकारी गणेश चाटे,नायब तहसीलदार संजय सोलनकर, नगर अभियंता कैलास येमलवाड, वरिष्ठ लिपिक गणेश मदने आदी उपस्थित होते.

नामनिर्देशनपत्र राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरीता कालावधी १०/११/२०२५ ते १७/११/२०२५




(दि.१७/११/२०२५ रोजी दुपारी ०३.०० पर्यंत) व रविवार या सुट्टींच्या दिवशी नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाहीत. नामनिर्देशनपत्राची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द दि१८/११/२०२५ सकाळी ११.०० वाजेपासुन तसेच अपील आक्षेप असल्यास दि २१/११/२०२५ ते दि २५/११/२०२५ अपिलाचा निर्णय करण्यात येईल त्या तारखेनंतर तिसऱ्या दिवशी किंवा तत्पूर्वी. मात्र दिनांक २५/११/२०२५ पर्यंत निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक २६/११/२०२५ राहील

भगत यांनी यावेळी स्पष्ट निर्देश दिले की, "आचार संहितेच्या अंमलबजावणी साठी तत्काळ कारवाई हवी. शहरांमधील सर्व बॅनर्स, पोस्टर्स, झेंडे, भिंतीवरील राजकीय घोषवाक्ये तात्काळ काढून आणि त्याचा अहवाल सादर करा." निवडणूकीत पोलिसांनी सतर्क राहण्याच्या तशा सूचना पोलीस प्रशासनाला दिल्या .

मतदार यादीतील दुबार मतदाराची शुद्धीकरण प्रक्रिया काटेकोरपणे पूर्ण पालन होईल असे त्यांनी सागितले.तसेच निवडणूक काळात कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस प्रशासनाने सतर्क राहावे, अशी सूचना दिली. लोकशाहीच्या या उत्सवामध्ये "लोकशाहीचे मूल्य जोपासून ही निवडणूक पारदर्शक, निर्भय आणि शांत वातावरणात पार पडेल, ही प्रत्येकाची जबाबदारी आहे," तसेच जनतेने जास्तीत जास्त मतदान करावे मतदानाचा टका वाढवा असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# राळेगाव येथे वंदे मातरम् गीत सामुहीक गायन संपन्न

**जितेंद्र खोडे**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:- जितेंद्र खोडे**

**राळेगाव :** रोजी क्रिडा संकुल येथे वंदे मातरम् सामुहिक गायन संपन्न झाले,जे गीत ऐकून भारतीयांच्या मनात देशभक्तीची उत्स्फुर्त भावना निर्माण होते,त्या 'वंदे मातरम्' गीताला १५० वर्षे पूर्ण होत आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने देशभरात मोठ्या उत्सवाचे आयोजन केले,महाराष्ट्रातील ३५८ तालुक्यातील ५००० हजार देशप्रेमी सोबत साजरा करण्यात आला,प्रथम पाहुण्याचे स्वागत करण्यात आले नंतर वंदे मातरम् गीत सादर केले,कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील,प्रमुख उपस्थिती तहसीलदार अमित भोईटे,पोलिस निरीक्षक शितल




मालटे, गटविकास अधिकारी केशव पवार,गटशिक्षणाधिकारी नवनाथ लहाने उपस्थित होते.


बंकिमचंद्र चटर्जी यांनी लिहिलेल्या या देशभक्तीपर अजरामर गीताचे सामूहिक गायन करण्यात आले.या प्रसंगी उपस्थितांनी एकत्रितपणे वंदे मातरम् गायले, ज्यामुळे वातावरणात देशभक्तीची भावना निर्माण झाली.हा क्षण भारतमातेच्या स्तुतीचा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात आला ज्यामुळे लोकांमध्ये देशभक्तीची भावना वाढावी हा मुख्य हेतू आहे,विद्यार्थ्यांनी खड्या आवाजात केलेले वंदे मातरम् चे समूहगान,अशा देशभक्तीने भारलेल्या वातावरणात वंदे मातरम् या अजरामर गीताचा शतकोत्तर महोत्सव साजरा करण्यात आला,या कार्यक्रमाचे आयोजन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था राळेगाव यांनी केले.

तसेच राळेगावातील सर्व शाळा उपस्थित होत्या,यावेळी न्यु इंग्लिश हायस्कूल, नेताजी विद्यालय,विराणी सायन्स कॉलेज, इंदिरा गांधी कला महाविद्यालय,कला वाणिज्य महाविद्यालय,स्कुल ऑफ ब्रिलियंट,मार्कन्डा पब्लिक स्कूल,बचपन स्कूल,तुकडोजी विद्यालय इत्यादी शाळा उपस्थित होत्या.

# पिलीव व परिसरात तुलसी विवाह अतिशय उत्साहात संपन्न"

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी ( रघुनाथ देवकर):-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव या ठिकाणी मोठ्या थाटामाटा मध्ये असंख्य भाविक भक्तांनी आप आपल्या घरासमोर तुलसी विवाहाचे आयोजन केले होते. या विवाहाच्या निमित्ताने असंख्य भाविक भक्तांनी आपल्या तुळशी मातेला रंगरंगोटी करून अतिशय चांगल्या पद्धतीने भक्ती भावाने सजवले होते. व त्यादिवशी दिपावली प्रमाणेच प्रत्येकाच्या घरोघरी आनंदी



आनंद असल्याचे जाणवत होते. भाविक भक्तांनी भक्तिभावातून पूजा करून तुलसीविवाह संपन्न केला. मंगलाष्टके, आरती असे धार्मिक विधी युक्त पद्धतीने व फटाक्याच्या आतषबाजीत व आनंदी वातावरणात तुलसी विवाह असंख्य भाविक भक्तांनी आपल्या घरोघरी साजरे केल्याचे समजते. पिलीवप्रमाणेच बचेरी, शिंगोर्णी, सुळेवाडी, झिंजेवस्ती, कुसमोड, फळवणी, काळमवाडी, कोळेगाव, तांदुळवाडी, साळमुख ,शेंडेचिंच, मळवली, भाळवणी या ठिकाणी श्री तुलसी मातेच्या विवाहाचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे समजते.

# विठ्ठलराव शिवरकर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी “अभंग तुकाराम” चित्रपट पाहून शिक्षणाला आध्यात्म्याची जोड देवून घेतला आनंद

**दैनिक युवक आधार**
**हडपसर, पुणे** -अस्तित्व कला मंच आयोजित "अभंग तुकाराम" या सिनेमाचे कलाकारांच्या उपस्थितीत विठ्ठलराव शिवरकर विद्यालयातील विद्यार्थ्यांना मोफत शो दाखविण्यात आला.

याप्रसंगी वारकरी संप्रदायाच्या वतीने टाळ मृदुंगाच्या गजराने सिनेमाच्या कलाकारांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी सिनेमातील कलाकारांनी टाळ मृदंगाच्या गजरासमवेत फुगडी व फेर धरून कार्यक्रमाची शोभा वाढवली. इतर सिनेमांच्या प्रीमियर पेक्षा या सिनेमाचे प्रीमियर हे वेगळे असल्याचे सर्वांना जाणवले. दिग्पाल लांजेकर यांनी मुलांना आपला सांप्रदाय समजला पाहिजे, या उद्देशानेच चित्रपटाची निर्मिती केल्याचे सांगितले.

आजच्या मोहमयी दुनियेत युवा पिढी भरकटत जात असताना त्यांना आपल्या प्राचीन अध्यात्मिक संस्कृतीची आठवण करून देणारा हा चित्रपट असल्याचे प्राचार्य लहू वाघुले सर यांनी सांगितले. याप्रसंगी चित्रपटातील कलाकार योगेश सोमण (संत तुकाराम),



मृणाल कुलकर्णी (राजमाता जिजाऊ),स्मिता शेवाळे (आवली), दिग्पाल लांजेकर (लेखक दिग्दर्शक), अवधूत गांधी (संगीतकार व दिग्दर्शक), व इतर कलाकार तसेच संस्थेचे सचिव चंद्रकांत ससाणे सर, प्राचार्य लहू वाघुले, सन्मित्र बँकेचे संचालक योगेश गोंधळे यांच्या प्रमुख उपस्थितीत चित्रपटाचा प्रीमियम शो संपन्न झाला.याप्रसंगी विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना अस्तित्व कला आयोजकांच्या वतीने खाऊवाटप करण्यात आले.

तर विठ्ठलराव शिवरकर सेवा प्रतिष्ठानचे सचिव चंद्रकांत ससाणे सर प्राचार्य लहू वाघुले सर, गोरक्षनाथ केंदळे, मंच्छिन्द्र रकटे, अरविंद शेंडगे, घनश्याम पाटील, युवराज देशमुख आदी शिक्षक तसेच वहिदा अवटी, श्रद्धा ससाणे, दीपा व्यवहारे, आशा भोसले, दीपाली जाधव, उज्वला पगारे, संगीता भुजबळ, कल्पना पैठणे, नलिनी गायकवाड आदी शिक्षकवृंद व पूजा धाडगे, कमल गायकवाड, कैलास वाडकर, अभिषेक शिवरकर आदी शिक्षकेतर कर्मचारी, सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# आमदार महेंद्र थोरवे यांच्या उपस्थितीत शेकडो मुस्लिम बांधवांचा शिवसेनेत प्रवेश

**दैनिक युवक आधार**
**खोपोली वार्ताहर :** ५ नोव्हेंबर रोजी - खोपोली शहरात आमदार महेंद्र थोरवे यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात अल्पसंख्याक समाजातील लोकांचा शिवसेनेत पक्षप्रवेशाचा कार्यक्रम पार पडला. ज्येष्ठ नेते बेबी (बेबीभाई) सॅमुअल आणि प्रभाग क्रमांक १२क्रांतीनगर येथील युवा नेते अयुब खान यांच्या नेतृत्वाखाली शेकडो मुस्लिम



बेबी सॅमुअल आणि अयुब खान यांच्या नेतृत्वाखाली पक्षप्रवेश

बांधव, तरुण आणि महिलांनी शिवसेना (एकनाथ शिंदे गट) मध्ये जाहीर पक्षप्रवेश केला. कर्जत खालापूर मतदारसंघात आमदार थोरवे यांनी केलेल्या विविध विकासकामांच्या जोरावर जनतेत वाढता विश्वास दिसून येत आहे. त्याचा प्रत्यय या पक्षप्रवेशावेळी आला. निवडणुकीच्या तोंडावर झालेल्या या पक्षप्रवेशामुळे खोपोलीतील शिवसेनेची संघटनात्मक ताकद लक्षणीयरीत्या वाढली आहे. आमदार थोरवे म्हणाले, "क्रांतीनगर प्रभाग क्रमांक १२ मधून अयुब खान यांच्या नेतृत्वाखाली झालेला पक्षप्रवेश हा शिवसेनेच्या कार्यप्रणालीवर लोकांचा विश्वास दर्शवतो.

# नैना प्रभावित शेतकऱ्यांना आमदार विक्रांत पाटील यांच्या माध्यमातून मोठा दिलासा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

नैना प्रभावीत क्षेत्रातील ग्रामस्थ व शेतकरी यांना अनेक वर्षे जाचक अटी शर्तींचा सामना करावा लागत होता.या सुलतानी भूमिकेच्या विरोधात विधानसभेत आवाज उठवत आमदार विक्रांत पाटील यांनी सरकार पुढे प्रश्न मांडल्याने पहिल्या टप्प्यातील बांधकामाला संरक्षण मिळाल्याचे शुभ संकेत विक्रांतदादा पाटील



यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या ठिकाणी जमलेल्या शेकडो शेतकऱ्यांच्या उपस्थित देण्यात आले. पनवेलकरांसाठी 365 दिवस 24 तास जनतेच्या सेवेसाठी खुले असणाऱ्या विक्रांतदादा पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या ठिकाणी याक्षणी मोठया उत्साहपूर्ण वातावरणाचा जल्लोष करत विक्रांत दादा पाटील आगे बढो, भारतीय जनता पार्टीचा विजय असो अश्या जयघोषात ऐकायला मिळाला. यावेळी शेतकऱ्यांनी एकमेकांना पेढे भरून महायुती सरकारचे आभार मानले

# नवीन पनवेल वाहतूक शाखेतर्फे जनजागृती प्रबोधन कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी :** पनवेल तालुक्यातील अजिवली येथील जनता विद्यामंदिर येथे नवीन पनवेल वाहतूक शाखा तर्फे वाहतूक नियमांचे पालन, सायबर गुन्हे प्रतिबंध आणि बालसंरक्षण कायद्याविषयी प्रबोधन कार्यक्रम घेण्यात आला.या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सुरक्षित वाहनचालना आणि वाहतुकीचे नियम याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्यामध्ये —गाडी चालवताना




सीट बेल्ट लावणे,दारू पिऊन वाहन न चालवणे,लेन कटिंग टाळणे,वाहन चालवताना मोबाइल फोनचा वापर न करणे,उलट्या दिशेने (wrong side) वाहन न चालवणे,रस्त्यावर वाहने पार्क न करणे,तसेच लायसन्स येईपर्यंत विद्यार्थी-विद्यार्थिनींनी कोणतेही वाहन न चालवणे- याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी हे नियम आपल्या पालकांनाही समजावून सांगावेत, असे आवाहन या वेळी करण्यात आले.कार्यक्रमादरम्यान सायबर गुन्ह्यांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी इंटरनेट वापरताना घ्यावयाची काळजी, मोबाईल वापराचे सुरक्षित नियम, तसेच सायबर हेल्पलाइन क्रमांक 1930 याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.याशिवाय लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण (POCSO) कायदा, बालविवाह कायदा आणि बालविवाहाचे दुष्परिणाम याबाबत सविस्तर मार्गदर्शन करून बालविवाह टाळण्याचे आवाहनही करण्यात आले.पोलीस मदतीची आवश्यकता असल्यास हेल्पलाइन क्रमांक 112 याचीही माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.या प्रबोधन कार्यक्रमात एकूण 160 विद्यार्थी व शिक्षकवर्ग सहभागी झाले. कार्यक्रमाचे मार्गदर्शन व. पो. नि. सकपाळ व हेड कॉन्स्टेबल वाघ यांनी केले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## घंटागाडी कामगारांच्या प्रलंबित मागण्यांकडे महापालिकेने लक्ष द्यावे – मनसेची मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिकेच्या घनकचरा विभागातील घंटागाडी कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेतर्फे करण्यात आली आहे.घनकचरा विभागाचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांना देण्यात आलेल्या निवेदनात कामगारांच्या अनेक मागण्यांबाबत चर्चा करण्यासाठी ४ नोव्हेंबर २०२५ रोजी शिष्टमंडळाला भेटीची वेळ देण्यात यावी, अशी विनंती करण्यात आली आहे.

**मनसेच्या निवेदनात नमूद करण्यात आलेल्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत –**




1. माजी कंत्राटदार साई गणेश इंटरप्रायझेस यांच्याकडील थकीत बोनस आणि पीएफ रकमेचे निवारण करावे.

2. कामगारांना कामाच्या वेळेस आवश्यक सुरक्षा साहित्य (Safety Gear) तातडीने उपलब्ध करून द्यावे.

3. कामगारांच्या गणवेशाचा रंग 'खाकी' करण्यात यावा.

4. प्रलंबित मेडिकल बिलांची तत्काळ मंजुरी व देयक करावे.

5. कामगारांच्या शिल्लक रजेच्या रकमांची पूर्तता लवकरात लवकर करण्यात यावी.

या सर्व मागण्यांचा पाठपुरावा करून तातडीने अंमलबजावणीसाठी आवश्यक आदेश जारी करावेत, अशी विनंती मनसेतर्फे करण्यात आली आहे.या प्रसंगी मनसे पनवेल शहर अध्यक्ष योगेश चिले व मनसे कामगार सेना उपाध्यक्ष राजेश भास्कर उज्जैनकर यांनी सांगितले की,"घंटागाडी कामगार हे शहराच्या स्वच्छतेचा कणा आहेत. त्यांच्या न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष होणे योग्य नाही. प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी."

## वंदे मातरम्' या अमर राष्ट्रगीताला १५० वर्ष पूर्ण; समूह गायनाने दुमदुमले मंत्रालय

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** वंदे मातरम्' या अमर राष्ट्रगीताला आज १५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मंत्रालयात आयोजित सामूहिक गायन कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रभावना दृढ करण्याचा संकल्प व्यक्त केला. सुप्रसिद्ध गायिका पद्मजा फेणाणी-जोगळेकर यांच्या नेतृत्वाखाली सर्व मान्यवरांनी एकत्र येऊन हे गीत गायले, तर दिल्लीतून व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रेरणादायी संबोधन झाले.



या कार्यक्रमात बोलताना फडणवीस म्हणाले, "या राष्ट्रीय गीताच्या मागे असणारी एकसंघ भारताची भावना, सुजलाम सुफलाम भारताची भावना, भारताला विश्वगुरू बनविण्याची भावना आणि सांस्कृतिक राष्ट्रवाद प्रतिपादित करणारी भावना प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचली पाहिजे." त्यांनी 'वंदे मातरम्'च्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर प्रकाश टाकताना सांगितले की, आजच्याच दिवशी १५० वर्षांपूर्वी बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी ही रचना पूर्ण केली होती. इंग्रजांच्या सत्तीच्या राष्ट्रगीताच्या विरोधात व्यथित होऊन बंकिमदांच्या लेखणीतून हे गीत जन्मले. त्यांच्या 'आनंदमठ' या कादंबरीत इंग्रजांच्या जुलमी राजवटीविरुद्ध बंडखोरी आणि समाजजागृतीची संकल्पना मांडली गेली आहे.

फडणवीस यांनी पुढे सांगितले की, रवींद्रनाथ ठाकूर यांनी काँग्रेस अधिवेशनात हे गीत गायल्यावर ते घोषवाक्य बनले. बंगाल विभाजनविरोधी वंगभंग चळवळीच्या एका सभेत ३०,००० लोकांनी पहिल्यांदा सामूहिक गायन केले. "स्वातंत्र्यलढ्यातील प्रत्येक विचारधारेला प्रेरणा देणारे आणि खंडित समाजाला एकत्र बांधणारे हे गीत राष्ट्रगानाप्रमाणे कार्यरत ठरले," असे त्यांनी नमूद केले.

भारतीय संविधानाच्या निर्मितीनंतर 'जन गण मन' आणि 'वंदे मातरम्' यांच्यातील वादावर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, "संविधानकारांनी दोन्ही गाणी राष्ट्रीय गीत म्हणून मान्यता दिली. 'वंदे मातरम्'मध्ये मातृभूमीची सुजलाम सुफलाम स्वरूप, दुष्टांचे निर्दालन आणि भरणपोषणाची भावना उजळून काढली आहे. आजही १५० वर्षांनंतर हे गीत देशाला दिशा देत आहे."

पंतप्रधान मोदी यांच्या 'विकसित भारत' संकल्पनेचा उल्लेख करताना फडणवीस म्हणाले, "विकास आणि विरासत ही 'विकास भी और विरासत भी' ही भावना आहे. देश आणि राज्य पातळीवर अनेक बृहद कार्यक्रम आयोजित केले आहेत. नालंदा-तक्षशिला सारख्या विद्यापीठांद्वारे जगाला ज्ञान देणारा, बुद्धतत्त्वज्ञान पसरवणारा स्वर्णिम वारसा पुन्हा उभारण्याचा आजचा संकल्प आहे."

कार्यक्रमास मंत्री मंगलप्रभात लोढा, मंत्री ॲड. आशिष शेलार आणि इतर मान्यवर उपस्थित होते. हा कार्यक्रम 'वंदे मातरम्'च्या सार्धशताब्दीचा सोहळा म्हणून ऐतिहासिक ठरला.

## दादरच्या स्टार मॉलमधील मॅकडोनाल्डला आग

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी मयुर प्रकाश धुरी**

दादर येथील स्टार मॉलमधील मॅकडोनाल्डच्या किचन विभागात आज दुपारी अचानक आग लागल्याची घटना घडली. ही आग किचनमधील इलेक्ट्रिक बॉक्समध्ये झालेल्या शॉर्ट सर्किटमुळे लागल्याचे प्राथमिक निष्कर्ष आहेत.आग लागल्याची माहिती मिळताच फायर ब्रिगेडच्या दहा गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. फायरमननी तत्काळ बचावकार्य सुरू करत काचा फोडून आत प्रवेश केला आणि आग विझवण्यात यश मिळवले.




या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, किचन विभागातील काही साहित्याचे नुकसान झाल्याचे सांगितले जाते.फायर अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार ही लेव्हल 1 प्रकारातील आग होती. आग नियंत्रणात आल्यानंतर परिसरात धूर पसरण्याचे प्रमाणही कमी करण्यात आले असून परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात असल्याचे फायर ब्रिगेडकडून सांगण्यात आले.

## विंचूर परिसरावर धुक्याची चादर – थंडीच्या आगमनाची चाहूल

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**विंचूर :** शहर व परिसरावर आज सकाळी दाट धुक्याची चादर पसरली होती. सकाळी लवकर उठलेल्या नागरिकांना काहीच दिसत नसल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. रस्त्यावर फक्त काही फूटांपर्यंतच दृश्य स्पष्ट दिसत असल्याने वाहतूक मंदावली होती.हवामान विभागाच्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून रात्रीचा पारा घसरत आहे आणि हिवाळ्याच्या आगमनाची चाहूल लागली आहे. वाढलेली गारठा आणि सकाळी पडणारे दाट धुके यामुळे पुढील काही दिवस तापमान आणखी खाली जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.शेतकरी सकाळी शेतात जाताना गारठ्यामुळे अधिक कपडे गुंडाळून बाहेर पडत आहेत. काही ठिकाणी सकाळी आठ वाजेपर्यंतही दाट धुक्याचे साम्राज्य कायम असल्याचे दिसून आले. विद्यार्थ्यांना शाळेत जाताना आणि कामगारांना कामावर निघताना मोठी गैरसोय झाली.



हवामान तज्ज्ञांच्या मते, पुढील काही दिवस सकाळच्या वेळी अशाच प्रकारचे धुके राहण्याची शक्यता असून नागरिकांनी वाहन चालवताना हेडलाईटचा वापर करून सावधगिरी बाळगावी, असा सल्ला देण्यात आला आहे. हळूहळू थंडी वाढत चालल्याने नागरिकांनी गरम चहा, कॉफी, आणि उबदार कपड्यांचा आसरा घेण्यास सुरुवात केली आहे. धुक्यामुळे विंचूर परिसरात हिवाळ्याचे आगमन जणू प्रत्यक्ष जाणवू लागले आहे.

## आ. अब्दुल सत्तार यांनी पाठपुरावा करून राठोड परिवारास ४ लाख रुपयांची शासकीय मदत

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव:-** तालुक्यातील नांदातांडा येथील शेतकरी कन्हीराम तुळशीराम राठोड यांचा विज पडून मृत्यू झाला होता. बुधवार दि.५ रोजी नांदा तांडा येथे आमदार अब्दुल सतार यांच्याहस्ते कन्हीराम राठोड यांचे वारसदार संगीताबाई कन्हीराम राठोड यांना चार लाख रुपयांच्या शासकीय मदतीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.शेतकरी कन्हीराम तुळशीराम राठोड यांचा वीज पडून मृत्यू झाला होता.त्यावेळी आमदार अब्दुल सत्तार यांनी नांदा तांडा येथे सांत्वन भेट देवून राठोड परिवाराची भेट घेऊन शोक व्यक्त केला होता. राठोड परिवारास लवकरात लवकर



शासकीय मदत मिळवून देऊ अशी ग्वाही आमदार अब्दुल सत्तार यांनी दिली होती.आमदार अब्दुल सत्तार यांनी याबाबत पाठपुरावा करून राठोड परिवारास ४ लाख रुपयांची शासकीय मदत मिळवून दिली. याप्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर आबा काळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक दारासिंग चव्हाण, सोयगाव तालुकाप्रमुख धरमसिंग चव्हाण ,शहर प्रमुख संतोष बोडखे, सयाजीराव वाघ, गणेश धोरमारे यांच्यासह हमराज जाधव, प्रकाश राठोड, युवा नेते व उपसरपंच कुणाल राजपूत तसेच तलाठी आकाश पिराने आदी उपस्थित होते.

## जोरण सजा येथील नागरिकांसाठी मनसेची ठोस भूमिका – तलाठी कार्यालय जोरणपाडा येथे सुरू करण्याची मागणी"

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी- कृष्णा गायकवाड (पिंपळगाव बसवंत)**

दिंडोरी तालुक्यातील जोरण सजा अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये नागरिकांना भेडसावणाऱ्या प्रशासकीय गैरसोयींचा मुद्दा आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने चव्हाट्यावर आणला आहे.

मनसे तालुका अध्यक्ष नामदेव देवराम गावित यांनी आज मा. तहसीलदार साहेब, दिंडोरी यांना यासंदर्भात निवेदन सादर केले.सदर सजामध्ये जोरण, जोरणपाडा, ठेपणपाडा आणि श्रीरामनगर ही गावे समाविष्ट आहेत. मात्र, या सजाचे तलाठी अधिकारी निगडोळ येथून कार्यरत असल्यामुळे ग्रामस्थांना अत्यंत मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.



शेतकरी, वृद्ध नागरिक, महिला आणि वाहनसुविधा नसलेल्या नागरिकांना सातबारा उतारा, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, निर्धन प्रमाणपत्र आदी शासकीय कागदपत्रांसाठी लांब अंतराचा प्रवास करावा लागतो. यामुळे वेळ, पैसा आणि श्रम या तिन्हींचा अपव्यय होत असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

मनसेने या पार्श्वभूमीवर ठामपणे मागणी केली आहे की जोरण सजा अंतर्गत कार्यरत तलाठी अधिकाऱ्यांना जोरणपाडा येथे कायमस्वरूपी कार्यालय उपलब्ध करून देण्यात यावे, जेणेकरून स्थानिक नागरिकांना होणाऱ्या अडचणींमध्ये मोठी घट होईल.

या निर्णयामुळे प्रशासन अधिक सुलभ आणि नागरिककेंद्री होईल, असा विश्वास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

**निवेदनकर्ते:**

मनोज ढिकले — जिल्हा उपाध्यक्ष, मनसे, नाशिक

नामदेव देवराम गावित — तालुका अध्यक्ष, मनसे, दिंडोरी

गुलाब गांगोडे सह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## नागोठण्यात 16 हजाराचा गुटखा जप्त ; एक अटकेत

**दैनिक युवक आधार**

**नागोठणे वार्ताहर :** येथील बाजार पेठेतील एका दुकानातून केशरयुक्त विमल पान मसाला व वी 1 तंबाखूची साधारण 16,280 रुपयांची पाकिटे बुधवार 05 नोव्हेंबर रोजी दुपारच्या सुमारास नागोठणे पोलिसांनी जप्त केली असून एक आरोपीला अटक केली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार बुधवार 05 नोव्हेंबर रोजी दुपारी 3.45 वाजण्याच्या सुमारास बाजार पेठेतील नेहल किराणा स्टोअर येथील दुकानातून 14,652 रु. कींमतीच्या प्रत्येक पाकीट 198 रुपये किंमत असलेले 74 चॉकलेटी रंगाचे पॅकेट त्यावर केसरयुक्त विमल पान मसाला तसेच 1,628 रुपये किंमतीचे प्रत्येक पाकीट 22 रुपये किंमत असलेले 74 चॉकलेटी रंगाचे पॅकेट त्यावर वी – 1 असे एकुण 16,280 रूपयांचा माल जप्त केला आहे. तसेच आरोपी क्र. 01 हर्षित अशोक पटेल वय 36 वर्षे रा. आंगारआळी पो. नागोठणे ता.रोहा याने मानवी आरोग्यास अपायकारक असलेला महाराष्ट राज्यात प्रतिबंधित तंबाखुजन्य गुटखा विक्रीकरीता बेकायदेशीर बाळगुन तो तंबाखूजन्य पदार्थ मानवी आरोग्यास व त्यावर महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४ क अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अंतर्गत नियम व नियमने २०११ क्र. असुमाअअधिसुचना ५००/७ जुलै २०२१ च्या आदेशाने नागरिकांच्या आरोग्यास हानी पोहचवणा-या अधिसुचनेदवारे विक्री व साठा करण्यास प्रतिबंध केलेल्या तसेच मानवी आरोग्यास अपायकारक मालाची विक्री करण्यासाठी स्वतः जवळ बाळगलेल्या स्थितीत मिळुन आला. त्याने सदरील माल आमटेम येथील आरोपी क्रमांक २ याचेकडुन खरेदी केला होता. या कारवाईत आरोपी क्रमांक एक याला नागोठणे पोलिसांनी अटक केली असून पुढील तपास सहा.पो.नि. सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पी.एस.आय.सूरज पाटील करीत आहेत.

## "पिलीव ग्रामपंचायतीच्या शिरपेचात मानाचा तुरा, महाराष्ट्र शासनातर्फे जिल्हा परिषदेच्या हस्ते सन्मानपत्र"

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी (रघुनाथ देवकर):** माळशिरस तालुक्यातील पिलीव ग्रामपंचायत ही नेहमीच विकासात्मक कामामध्ये अग्रेसर असते. विकास कामाला नेहमीच सर्व लोकप्रतिनिधी, नेतेमंडळी, ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य होत असते. त्यामुळे यापूर्वीही पिलीव ग्रामपंचायतला शासनाकडून प्रोत्साहनात्मक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. आणि सध्या पिलीव ग्रामपंचायतमध्ये प्रशासकराज असताना देखील यशाची परंपरा प्रशासकांनी जोपासली असल्याचे निश्चितपणे म्हणावे लागेल. प्रशासकीय काळामध्ये शासनाने केलेल्या आव्हानानुसार प्रत्येक कार्यामध्ये प्रशासक मिसाळ भाऊसाहेब,




ग्रामपंचायत अधिकारी भंडलकर भाऊसाहेब व स्टाफने चालू काळामध्ये प्रत्येक शासनाच्या कार्यामध्ये सहभाग नोंदवून पिलीव ग्रामपंचायतच्या शिरपेचात पुरस्काराच्या रूपाने मानाचा तुरा रोवला असल्याचे जिल्हा प्रशासनाने आपल्या निरीक्षणातून पुरस्कार देऊन केल्याचे दिसून आले असून त्याचे फलित म्हणून जिल्हा परिषद सोलापूर प्रशासनाने प्रशासक मिसाळ भाऊसाहेब, ग्रामपंचायत अधिकारी भंडलकर भाऊसाहेब लेखनिक सोमनाथ देशमुख यांना सन्मानित केले आहे. ही बाब पिलीव नगरीला निश्चितच भूषणावह असल्याचे मानले जात आहे. पिलीव ग्रामपंचायतचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## विद्यार्थी दिनानिमित्त प्रेरणादायी उपक्रम – अनिल सदावर्ते यांचा शैक्षणिक कार्यासाठी योगदान

**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र:- राजू शिंदे :** महाराष्ट्रभर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रवेश दिनानिमित्त विद्यार्थी दिन उत्साहात साजरा करण्यात येतो. या निमित्ताने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नूतन वसाहत, तळणी येथेही विद्यार्थी दिन मोठ्या उत्साहात, आनंदमय वातावरणात पार पडला. या विशेष दिवशी शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी आणि स्थानिक नागरिकांनी शाळेच्या विकासासाठी प्रेरणादायी पाऊल उचलले. तळणी गावचे प्रतिष्ठित नागरिक, तसेच या शाळेचे माजी विद्यार्थी श्री. अनिल सदावर्ते यांनी सध्या संभाजीनगर येथे कार्यरत असतानाही, आपल्या मातृसंस्थेबद्दल असलेले जिव्हाळे आणि कृतज्ञता व्यक्त करत शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी रु. ७००/- इतका मदत निधी पाठविला.

या उदात्त कृतीबद्दल जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नूतन वसाहत, तळणी तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सर्व सदस्य, मुख्याध्यापक व शिक्षकवर्ग यांनी श्री. सदावर्ते यांचे



मनःपूर्वक आभार व्यक्त केले.शाळेच्या वतीने असे सांगण्यात आले की > "श्री. अनिल सदावर्ते यांच्यासारखे माजी विद्यार्थी हे शाळेच्या विकासाचे खरे बळ आहेत. त्यांच्या या कृतीमुळे सध्याच्या विद्यार्थ्यांना मदतीचा आणि प्रेरणेचा उत्तम संदेश मिळतो."

या निमित्ताने शाळेत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर भाषण, गाणी, कविता व नाटिका सादर करून विद्यार्थी दिन साजरा केला.शाळेचे प्रांगण विद्यार्थ्यांच्या आनंदाने गजबजून गेले होते. "शाळेच्या प्रगतीसाठी प्रत्येक माजी विद्यार्थी आणि गावातील नागरिकांनी आपल्या परीने हातभार लावला तर आपली शाळा आणखी उज्वल कामगिरी साध्य करेल

सारांश:

७ नोव्हेंबरच्या या विद्यार्थी दिनाच्या निमित्ताने शाळेचा गौरव वाढविणारी श्री. अनिल सदावर्ते यांची ही दातृत्वपूर्ण कृती सर्वांसाठी आदर्श ठरली आहे. शैक्षणिक क्षेत्रासाठी अशा सामाजिक संवेदनशीलतेच्या कृतीच समाजाच्या प्रगतीचा पाया आहे.

विद्यार्थी दिनानिमित्त प्रेरणादायी उपक्रम — अनिल सदावर्ते यांचा शैक्षणिक कार्यासाठी योगदान

महाराष्ट्रभर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रवेश दिनानिमित्त विद्यार्थी दिन उत्साहात साजरा करण्यात येतो. या निमित्ताने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नूतन वसाहत, तळणी येथेही विद्यार्थी दिन मोठ्या उत्साहात, आनंदमय वातावरणात पार पडला.

या विशेष दिवशी शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी आणि स्थानिक नागरिकांनी शाळेच्या विकासासाठी प्रेरणादायी पाऊल उचलले. तळणी गावचे प्रतिष्ठित नागरिक, तसेच या शाळेचे माजी विद्यार्थी श्री. अनिल सदावर्ते यांनी सध्या संभाजीनगर येथे कार्यरत असतानाही, आपल्या मातृसंस्थेबद्दल असलेले जिव्हाळे आणि कृतज्ञता व्यक्त करत शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी रु. ७००/- इतका मदत निधी पाठविला.या उदात्त कृतीबद्दल जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नूतन वसाहत, तळणी तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सर्व सदस्य, मुख्याध्यापक व शिक्षकवर्ग यांनी श्री. सदावर्ते यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

शाळेच्या वतीने असे सांगण्यात आले की — "श्री. अनिल सदावर्ते यांच्यासारखे माजी विद्यार्थी हे शाळेच्या विकासाचे खरे बळ आहेत. त्यांच्या या कृतीमुळे सध्याच्या विद्यार्थ्यांना मदतीचा आणि प्रेरणेचा उत्तम संदेश मिळतो."या निमित्ताने शाळेत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर भाषण, गाणी, कविता व नाटिका सादर करून विद्यार्थी दिन साजरा केला.शाळेचे प्रांगण विद्यार्थ्यांच्या आनंदाने गजबजून गेले होते.

"शाळेच्या प्रगतीसाठी प्रत्येक माजी विद्यार्थी आणि गावातील नागरिकांनी आपल्या परीने हातभार लावला तर आपली शाळा आणखी उज्वल कामगिरी साध्य करेल

**सारांश:**

७ नोव्हेंबरच्या या विद्यार्थी दिनाच्या निमित्ताने शाळेचा गौरव वाढविणारी श्री. अनिल सदावर्ते यांची ही दातृत्वपूर्ण कृती सर्वांसाठी आदर्श ठरली आहे. शैक्षणिक क्षेत्रासाठी अशा सामाजिक संवेदनशीलतेच्या कृतीच समाजाच्या प्रगतीचा पाया आहे.

## गिरवी गावची कन्या दिपाली खरात हिने महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून मिळविलेल्या उत्तुंग यशाबद्दल गावोगावी होतेय स्वागत

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी (रघुनाथ देवकर):** गिरवी तालुका माळशिरस येथील अतिशय आर्थिक परिस्थिती नाजूक असलेल्या घरात कुटुंबातील कुमारी दिपाली शारदा शिवाजी खरात हिने आपल्या समोर आलेल्या सर्व संकटांवरती मात करून मोठ्या जिद्दीने आणि आर्थिक परिस्थितीच्या पुढच्या रेट्याच्या दबावाखाली न डगमगता बुद्धी चातुर्यावरती प्राथमिक शिक्षणापासूनच एक मोठी जिद्द आणि चिकाटी ठेवून माध्यमिक आणि उच्च माध्यमिक क्षेत्रामध्ये आपल्या भविष्याच चित्र रंगवून आपल्या आई-वडिलांच्या स्वप्नांना जोपासून मोठ्या धैर्याने महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून घवघवीत यश संपादन करीत सहाय्यक राज्यकर आयुक्त गट अ या उच्च पदावरती झेप घेऊन माळशिरस



तालुक्याच्या शिरपेचामध्ये सन्मानाचा तुरा उभारल्याबद्दल सद्गुरु श्री श्री साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन बाळासाहेब कर्णवर पाटील,सौ.शोभा कर्णवर पाटील त्याचप्रमाणे सेवानिवृत्त अभियंता पाटबंधारे विभाग श्री. विजय मारकड, सौ उषाताई मारकड (संचालिका सद्गुरु श्री श्री साखर कारखाना) या कर्णवर पाटील व मारकड यांच्या परिवाराने त्याचप्रमाणे असंख्य नातेवाईक स्नेही मंडळी व तालुकावासियांना कुमारी दिपाली खरात हिने गिरवी गावाचे नाव उंचावले असल्याची चर्चा सर्वत्र होत आहे.

# मातृभूमीच्या 'वंदे मातरम्' अमरस्तोत्रातून देशभक्तीचा जागर

## राष्ट्रप्रेमी उत्सव मातृभूमीप्रती अभिमान, एकता आणि देशभक्तीची भावना जागवणारा अविस्मरणीय अनुभव

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (हरेश साठे)** : स्वातंत्र्य लढ्यातील सेनानी व शहिदांना वंदन आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक असलेल्या 'वंदे मातरम' गीतमध्ये अल्पाक्षरत्व, अर्थपूर्णता आणि अर्थसंपन्नता ही तीन प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. मातृभूमीचे साक्षात चित्र प्रत्येकाच्या हृदयात करण्याचे सामर्थ्य या गीतामध्ये आहे. हे मातृभूमीचे स्तवन तर आहेच; पण त्याशिवाय त्यामध्ये मातृभूमीच्या कर्तृत्वाचे, तिच्या श्रेष्ठत्वाचे आणि आदरणीय स्वरूपाचे चित्रही रेखाटले आहे. 'वंदे मातरम्' हे एक मातृभूमीचे अमरस्तोत्र आहे आणि त्याचा गजर देशभर घुमत असताना पनवेलमध्येही वंदे मातरम गीताचे भव्य स्वरूपात समूहगायन झाले. नविन पनवेल मधील बांठिया विद्यालयाच्या मैदानावर झालेला हा राष्ट्रप्रेमी उत्सव मातृभूमीप्रती अभिमान, एकता आणि देशभक्तीची भावना जागवणारा अविस्मरणीय अनुभव ठरला.

'वंदे मातरम' या राष्ट्रगीताच्या १५० व्या वर्षानिमित्त भारतीय जनता पक्षातर्फे देशभरात १५० ठिकाणी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्या अनुषंगाने शुक्रवारी (दि. ०७) महाराष्ट्र प्रदेश आणि उत्तर रायगड भाजपच्यावतीने नविन पनवेल मधील के. ए. बांठिया विद्यालय येथे 'वंदे मातरम' समूह गायन विशेष कार्यक्रम राज्याचे वने मंत्री गणेश नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने अभिनेते व राष्ट्रविचाराचे प्रसिद्ध व्याख्याते शरद पोंक्षे यांचे प्रमुख वक्ते म्हणून वंदे मातरम गीताची पार्श्वभूमी व महत्व यावर मार्गदर्शन झाले. यावेळी या कार्यक्रमाचे प्रमुख संयोजक आमदार प्रशांत ठाकूर,



भाजपचे ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, दिबांचे चिरंजीव अतुल पाटील, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, ज्येष्ठ नेते वसंत भोईर, श्रीनंद पटवर्धन, सुनील घरत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, दिपके बेहेरे, चारुशीला घरत, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, माजी शहर अध्यक्ष अनिल भगत, जयंत पगडे, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा प्रिया मुकादम, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, भाजपचे पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंझारराव, नवीन पनवेल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, कळंबोली मंडल अध्यक्ष अमर पाटील, कामोठे मंडल अध्यक्ष विकास घरत, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, ब्रिजेश पटेल, कामगार आघाडीचे प्रदेश सचिव संजय भगत, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, माजी नगरसेवक मनोज भुजबळ, मनोहर म्हात्रे, बबन मुकादम, रवींद्र भगत, तेजस कांडपिळे, नरेश ठाकूर, समीर ठाकूर, सुनील बहिरा, प्रभाकर बहिरा, माजी नगरसेविका सुशीला घरत, राजेश्री वावेकर, प्रिती जॉर्ज, वृषाली वाघमारे, माजी पंचायत समिती सदस्य निलेश पाटील, जिल्हा सदस्य जितेंद्र म्हात्रे, ॲड. चेतन जाधव, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, युवा मोर्चाचे नवीन पनवेल अध्यक्ष मयूर कदम, पनवेल अध्यक्ष हिमेश बहिरा, रोहित जगताप, यांच्यासह पदाधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

बंकिमचंद्र चटर्जी यांनी 'वंदे मातरम्' हे गीत लिहिले याला १५० वर्षे पूर्ण झाले. 'वंदे मातरम्' असे शब्द उच्चारताच प्रत्येक भारतीयाच्या रोमा-रोमात देशभक्तीचा संचार होतो. स्वातंत्र्यलढ्यात 'वंदे मातरम्' असे म्हणत कितीतरी सत्याग्रहींनी ब्रिटिश साम्राज्याची श्रृंखला तोडण्यासाठी कारागृहाचा मार्ग पत्करला. काळ्या पाण्याची शिक्षा अनुभवली, अनेकजण त्या वेदीवर हुतात्मा झाले. या साऱ्यांच्या मागे प्रेरणा होती ती 'वंदे मातरम्' या गीताची आणि या तेजस्वी मंत्राची. या गीताची महती कितीही वर्षे उलटली, तरी ती सदैव प्रत्येक भारतीयाच्या कानात घुमत आहे. रवींद्रनाथ टागोर



यांनी राष्ट्रीय महासभेच्या अधिवेशनात १८९६ यावर्षी प्रथम वंदे मातरम् ही रचना गायली होती. राष्ट्रीय महासभेने याच वर्षी हे गीत, त्यातील पहिली दोन कडवी राष्ट्रगीत म्हणून स्वीकारले आणि अनुसरले. या गीतावर आधारित एक सुंदर चित्रांकन प्रकाशित झाले होते. त्यातील समर्पकता आणि अर्थपूर्णता विहंगम आणि तेवढीच प्रेरक आहे. १९०५ यावर्षी वंगभंगाची चळवळ शिखरावर पोहोचली, तेव्हा हे गीत बंगालमध्ये प्रत्येक गावोगावी, पंचक्रोशीत घुमू लागले आणि सरकारला बंगालची फाळणी रद्द करावी लागली. हा भारतीयांच्या प्रखर देशभक्तीचा अभूतपूर्व विजय होता. महर्षी अरविंद यांनी या गीताचे वर्णन राष्ट्रगीत असे केले. या गीतावर ब्रिटिश सरकारने बंदी घातली आणि कोणीही समूहाने हे गीत म्हटले की, त्यांना तुरुंगात टाकले जाऊ लागले; पण जितका विरोध, तेवढा प्रतिकार या न्यायाने हे गीत कोट्यवधी भारतीयांच्या ओठावर घुमू लागले. ब्रिटिशांनी या गीतावर बंदी घातली, तरीही हे गीत भारताच्या हृदयातून एखाद्या कारंजीप्रमाणे सतत उसळत राहिले, प्रेरणा देत राहिले. या गीताच्या निर्मितीचे मर्म ब्रिटिश वसाहतवादी व्यवस्थेच्या शोषणात आहे. 'आनंदमठ' कादंबरीमध्ये बंड केलेल्या संन्याशांनी एकत्र येऊन आपल्या मातृभूमीच्या मुक्ततेसाठी गायिलेले हे गीत आहे. कादंबरीचे कथानक आणि गीताची रचना यांचा कालावधी भिन्न असला तरी लेखकाच्या अभिव्यक्तीतील साधर्म्य आणि संतुलन पाहता, तत्कालीन समाजजीवनातील वसाहतवादी सत्तेविरुद्धच्या असंतोषाचा स्फोट या गीतामध्ये झाला आहे. त्यामध्ये देशभक्ती आणि समाजाभिमुख सेवेचा आदर्श यांचा मनोज्ञ संगम झाला असल्याचे दिसून येते. हे गीत त्यामुळे भारताचे राष्ट्रगीत आहे, समाजगीत आहे आणि संस्कृतीगीत सुद्धा आहे. हे मातृभूमी, तुझ्या प्रेरणेने मी नतमस्तक होतो, हे सूत्र घेऊन या गीताची बंकिमचंद्र चटर्जी यांनी 'आनंदमठ' या कादंबरीत रचना केली. त्यांचा प्रत्येक शब्द देशभक्तीच्या भावनेने ओथंबलेला होता आणि आपल्या पुण्यभूमी, पितृभूमी, मातृभूमी विषयी अपार कळवळा आणि प्रेम अभिव्यक्त करणारा होता. वंदे मातरम गीत संपूर्ण देशाला सदैव प्रेरक आणि सदैव नवी स्फूर्ती देत आहे. आज 'वंदे मातरम्' हे केवळ एक गीत नाही, तर ती भारताच्या आत्म्याची ओळख आहे. या गीताने भारतीयांना परत परत आपल्या भूमीशी, संस्कृतीशी आणि स्वाभिमानाशी जोडले आहे. प्रत्येक पिढीला देशासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा देणारा हा अमर मंत्र आजही तेवढ्याच तेजाने घुमतो आहे. राष्ट्रभक्तीची ही ज्योत अखंडपणे प्रज्वलित ठेवणे, हीच खरी श्रद्धांजली सर्व शहीदांना आणि सेनानींना आहे. त्यामुळे या कार्यक्रमाचे महत्व अनन्य साधारण असल्याने विविध विद्यालयातील तीन हजाराहून अधिक विद्यार्थी, विविध संघटना, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक या उत्सवात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते

> “ मातृभूमीबद्दलचा अभिमान अधिक वृद्धिंगत व्हावा आणि 'वंदे मातरम' गीताची प्रेरणा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. देशभक्तीचे हे वातावरण बघून प्रभावित झालो आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांना समाजातील सुख दु:खाची जाण आहे त्यामुळे ते अशी समाजोपयोगी उपक्रम राबवित असतात.
> - राज्याचे वने मंत्री गणेश नाईक

> “ 'वंदे मातरम'चा कुठल्याही धर्माशी संबंध नाही. हे गीत ही आपल्या मातृभूमीला, आपल्या पृथ्वीमातेप्रती अर्पण केलेली आदरांजली आहे. या गीतात आपल्या देशाबद्दलची अपार श्रद्धा, प्रेम आणि अभिमान व्यक्त झाला आहे. भारतभूमीचा इतिहास अलौकिक आहे, संस्कृती अद्वितीय आहे, आणि जगाच्या पाठीवर तिच्यासारखी दुसरी भूमी नाही. त्यामुळे 'वंदे मातरम'चा खरा अर्थ प्रत्येक भारतीयाने समजून घेतला पाहिजे. हे केवळ गीत नाही, तर आपल्या राष्ट्रभावनेचे, एकात्मतेचे आणि स्वाभिमानाचे प्रतीक आहे.
> - शरद पोंक्षे, अभिनेता व राष्ट्रविचाराचे प्रसिद्ध व्याख्याते

> “ “'वंदे मातरम' हे गीत सर्वांच्या अस्मितेचे प्रतीक असून ते भारतीय संस्कृतीचे आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक आहे. आज या गीताला १५० वर्षे पूर्ण झाली. हे गीत भारतभूमीला दिलेला ठेवा आहे. केंद्र व राज्य सरकारने हे कार्यक्रम करत असताना भाजपनेही त्याच अनुषंगाने व्यापक स्वरूपात कार्यक्रम आयोजित केले आहेत. भारतभूमी बद्दल सर्वांना अभिमान आहे. त्यामुळे वंदे मातरम गीत जनमनापर्यंत आणि पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष कार्यक्रमात विद्यार्थी, संस्था, संघटना, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले, त्याबद्दल मी सर्वांचे मनापासून आभार मानतो.
> - कार्यक्रम प्रमुख संयोजक आमदार प्रशांत ठाकूर

# शहरीकरण : विकासाचे क्षितिज की सामाजिक संतुलनाचे आव्हान

**दरवर्षी ८ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण जगात 'जागतिक शहरीकरण दिन' म्हणून पाळला जातो. आधुनिक मानवसभ्यतेपुढील सर्वात वेगाने घडणाऱ्या सामाजिक प्रक्रियांपैकी शहरीकरण ही एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे. शहरांचा विस्तार, लोकसंख्येचे स्थलांतर, जीवनशैलीतील बदल, पर्यावरण-विकासातील संघर्ष, अर्थव्यवस्थेतील नवीन संरचना आणि सांस्कृतिक मूल्यव्यवस्थेचा पुनर्विचार यांद्वारे शहरीकरण मानवी समाजाचे भविष्य ठरवत आहे. आज जगातील ४० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या शहरी भागात राहते आणि पुढील काही दशकांत ही संख्या ७० टक्क्यांपर्यंत पोहोचेल, असे तज्ज्ञ मानतात. अशा परिस्थितीत शहरीकरणाचा अभ्यास केवळ भौगोलिक किंवा आर्थिक विषय नसून मानवी जीवनाच्या समग्र परिवर्तनाची प्रक्रिया म्हणून पाहण्याची गरज आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून शहरीकरण समजून घेताना आपल्याला व्यक्ती, कुटुंब, समुदाय, संस्था, पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि सांस्कृतिक संरचना, सामाजिक समस्या या सर्व स्तरांकडे एकत्र पाहावे लागते. कारण शहरीकरण हे केवळ माणूस कुठे राहतो याचा प्रश्न नसून माणूस कसा राहतो, कसा विचार करतो, आणि कशातून आपली सामाजिक ओळख घडवतो याचा प्रश्न आहे.**

शहरीकरणाची प्रक्रिया पाहताना सर्वप्रथम लक्षात येते ते म्हणजे ग्रामीण लोकसंख्येचे शहरांकडे झपाट्याने होणारे स्थलांतर. ग्रामीण भागातील रोजगाराच्या मर्यादित संधी, शेतीवरील अवलंबन, शेती उत्पन्नातील अस्थिरता, शिक्षण आणि आरोग्य सुविधा अपुऱ्या असणे, तसेच आधुनिक जीवनशैलीकडे आकर्षण या कारणांमुळे लोक शहरांमध्ये संधींच्या शोधात येतात. शहर व्यक्तीला नवीन ओळख, आर्थिक स्थैर्य, कौशल्यविकास आणि प्रगतीची संधी उपलब्ध करून देते. विशेषतः युवकांसाठी शहर 'स्वप्नपूर्तीचे केंद्र' ठरते. शिक्षण संस्था, उद्योग, आय टी कंपन्या, व्यावसायिक क्षेत्रे, सर्जनशील उपक्रम आणि उद्यमशीलतेच्या संधी यामुळे शहर आधुनिक उन्नतीचा प्रतीक बनते. स्त्रियांसाठी विशेषतः शहराने शिक्षण, रोजगार आणि स्वावलंबनाच्या दृष्टीने नवे दरवाजे उघडले आहेत. त्यामुळे शहरीकरणाने स्त्री-पुरुष समानतेच्या चळवळीला नवीन गती दिली आहे.

परंतु शहरीकरणाचे वास्तव इतके सरळसोपे नाही. संधींसोबतच शहरात आव्हानांचे प्रचंड जाळेही आहे. शहर म्हणजे चमकणारे दिवे, उंच इमारती, व्यस्त रस्ते आणि गतिमान वाहतूक होय. परंतु या चमकाखाली संघर्ष, असमानता, तणाव आणि अस्थैर्याचे वास्तव दडलेले असते. ग्रामीण भागातून शहरात आलेल्या बहुसंख्य लोकांना परवडणारी घरे मिळत नाहीत. शहरातील जमीन महाग आणि मर्यादित असल्याने झोपडपट्ट्या विकसित होतात. झोपडपट्टीकरण हे शहरीकरणाचे मोठे सामाजिक आव्हान आहे. अरुंद घरं, गर्दी, अस्वच्छता, सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा अभाव, आरोग्यसेवा अपुरी, वाहतूक आणि शिक्षणाच्या मर्यादित सुविधा यामुळे शहराचा विकास एकतर्फी आणि विषम वाटू लागतो. एका बाजूस गगनचुंबी इमारती आणि आलिशान सोसायट्या, तर दुसऱ्या बाजूस झोपड्या ही दृश्यगती शहरीकरणातील सामाजिक विषमतेचे प्रतीक बनते.

समाजशास्त्राच्या भाषेत शहर हा 'व्यक्तिनिष्ठ समाज' (Individualistic Society) मानला जातो. ग्रामीण समाजात नाती, परस्परसहकार्य, शेजारधर्म आणि वृत्तीतील एकोप्याला महत्त्व असते. परंतु शहरात व्यक्तीची जीवनशैली अधिक स्पर्धात्मक, वेगवान आणि एकाकी होते. कामाचा ताण, वेळेचे बंधन, करिअरची धडपड, आर्थिक खर्चाचा दबाव यामुळे सामाजिक नात्यांची उब कमी होते. कुटुंबव्यवस्थेच्या दृष्टीनेही शहरीकरणाचे परिणाम खोलवर आहेत. संयुक्त कुटुंबे कमी होत गेली आणि विभक्त कुटुंब प्रबळ झाले. पालक आणि मुलांमधील संवादाचे स्वरुप बदलले. ज्येष्ठ आणि बालक सांभाळण्याची जबाबदारी वाढली. वृद्धांची सामाजिक स्थानिक ओळख कमी झाली. तरुण पिढी आधुनिक विचारसरणी अंगीकारताना परंपरा आणि सांस्कृतिक मूल्यसाखळी यांच्यात अंतर वाढू लागले.

सांस्कृतिक स्तरावर शहर जागतिक संस्कृतीचे प्रवेशद्वार बनले आहे. फॅशन, ग्लोबल मीडिया, मनोरंजन क्षेत्र, डिजिटल संस्कृती, उपभोक्तावाद आणि ब्रँड ओळखीमुळे व्यक्तीचे आत्ममूल्य 'उपभोग क्षमते'वर आधारित होत चालले आहे. समाजात प्रतिष्ठा, सन्मान आणि ओळख यांचे अर्थ बदलत आहेत. आजचा माणूस 'असण्यात' कमी आणि 'दिसण्यात' अधिक गुंतला आहे. त्यामुळे जीवनातील समाधानाचा स्रोत वस्तूंमध्ये, अनुभवांमध्ये आणि बाह्यकेंद्रित यशात शोधला जात आहे. त्यामुळे मानसिक आरोग्यावरही शहरीकरणाचे गंभीर परिणाम दिसून येतात. तणाव, नैराश्य, एकटेपणा, स्पर्धा, असुरक्षितता आणि भावनिक अस्थिरता हे शहरी जीवनाचे छुपे साथीदार झाले आहेत.

शहरीकरणाचे आणखी एक मोठे आव्हान म्हणजे पर्यावरणीय असंतुलन होय. शहरांचा विस्तार म्हणजे नैसर्गिक संसाधनांवर प्रचंड ताण होय. जंगलांची तोड, नदी आणि नाले बुजवणे, वाहनांची वाढ, रासायनिक उत्सर्जन, प्लास्टिक कचरा, पाणी, ध्वनी आणि हवा प्रदूषण यामुळे शहरांचे पर्यावरण अस्वस्थ झाले आहे. पावसाळ्यात शहरी पूर, उन्हाळ्यात पाण्याची टंचाई, हवेच्या गुणवत्तेत घट, उष्ण बेट प्रभावामुळे तापमान वाढ आणि ऋतुचक्रात विसंगती असे परिणाम सर्वत्र दिसतात. अशी परिस्थिती मानवाच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यास गंभीर धोका निर्माण करते.

तरीही, शहरीकरणाचे सकारात्मक पैलूही तितकेच ठळक आहेत. शहर ही प्रगतीची प्रयोगशाळा आहे. येथे विविध भाषा, संस्कृती, धर्म, परंपरा, विचारधारा आणि जीवनशैली एकत्र येतात. त्यामुळे शहरात विविधतेतून नवी सामाजिक रचना निर्माण होते. शिक्षण संस्थांमुळे वैज्ञानिक दृष्टी वाढते, संशोधन व नवकल्पना घडतात, कला-साहित्य-नाट्य-संगीत-विचार यांची देवाणघेवाण होते. मानवाधिकार, स्त्री-पुरुष समानता, सामाजिक न्याय, पर्यावरण संरक्षण, युवा सहभाग अशा आधुनिक चळवळी शहरांतूनच गतिमान झाल्या आहेत. शहर कल्पनांना उलगडते, व्यक्तिमत्त्व घडवते आणि स्वप्ने जगण्याची संधी देते.

म्हणूनच, प्रश्न शहरीकरणाचा विरोध करण्याचा नाही; तर त्याला योग्य दिशादर्शन देण्याचा आहे. शहरी विकास सर्वसमावेशक, पर्यावरणपूरक, मानवी मूल्यांवर आधारित आणि सामाजिक न्याय साधणारा असायला हवा. शहरांची रचना 'माणूस-केंद्रित' असावी; केवळ पायाभूत सुविधांवर आधारित नाही. सार्वजनिक वाहतूक, परवडणारी घरे, स्वच्छता, आरोग्य सुविधा, हरित क्षेत्र, पादचारी व सायकल मार्ग, सांस्कृतिक खुली मैफिली, सामुदायिक संवादाची जागा ही सर्व शहराच्या आरोग्यासाठी तितकीच आवश्यक आहेत जितकी उद्योग आणि तंत्रज्ञान आवश्यक आहे.

जागतिक शहरीकरण दिनाचे महत्त्व हेच की आपण शहरांच्या वाढीला फक्त वेग द्यायचा नाही, तर दिशा द्यायची आहे. शहर विकसित व्हावं, पण त्याचसोबत नाती, भावना, पर्यावरण, सामाजिक न्याय आणि मानवी सन्मान यांचे संरक्षण व्हावे. शहर उंच व्हावं, पण माणसाचं मनही उंच राहिलं पाहिजे. शहरांनी समता आणि मानवतेचा स्पर्श न हरवता संधी दिल्या पाहिजेत.

शेवटी, शहर हे केवळ भौगोलिक जागा नसून 'मानवी जीवनाचा स्पंदनबिंदू' आहे. शहरांनी जर माणसाला सहकार्य, संवेदना, विश्वास आणि परस्परसंबंध यांसह जगायला शिकवले तरच शहरीकरण खऱ्या अर्थाने मानव सभ्यतेच्या विकासाचा दीपस्तंभ बनेल. अन्यथा, शहरीकरण प्रगतीच्या नावाखाली मानवी आत्म्याला निर्जीव करणारा प्रवास ठरू शकतो. म्हणूनच आजच्या या जागतिक शहरीकरण दिवसाच्या निमित्ताने आपण आपल्या शहरांकडे फक्त 'रचना' म्हणून नव्हे, तर 'जीवनशैली, संस्कृती आणि मानवी संबंधांचे घर' म्हणून पाहण्याची संवेदनशीलता जपली पाहिजे.

# विद्यार्थी दिवस : शिक्षणाचा महामहोत्सव — ज्ञानाच्या दीपाची उजळण

## बाबासाहेबांच्या विचारांचा प्रकाश आजही तितकाच तेजस्वी !

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी – प्रकाश गवारे**

आज दिनांक ०७ नोव्हेंबर हा भारतीय इतिहासातील एक प्रेरणादायी आणि अभिमानास्पद दिवस आहे. कारण या दिवशीच शिक्षणसम्राट, मानवतेचे तारणहार, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, ज्ञानाचे मूर्तिमंत प्रतीक महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रथमच शाळेच्या उंबरठ्यावर पाऊल ठेवले होते. हा दिवस त्यांच्या शालेय जीवनाचा प्रारंभबिंदू ठरून पुढे संपूर्ण मानवजातीसाठी शिक्षणाचा दीप प्रज्वलित करणारा ठरला. त्यामुळेच आजचा दिवस “विद्यार्थी दिवस” म्हणून साजरा करण्यात येतो.

**शिक्षणाच्या प्रवासाची पहाट**

लहान भिमरावने साताऱ्यातील प्रतापसिंह हायस्कूलमध्ये घेतलेले पहिले पाऊल हे फक्त शालेय जीवनाची सुरुवात नव्हे, तर शिक्षणक्रांतीची पहाट होती. त्या एका छोट्या पावलाने पुढे कोट्यवधी लोकांच्या आयुष्यात प्रकाश आणला.

अत्यंत गरिबी, सामाजिक विषमता, जातीभेद, उपेक्षा आणि अन्याय यांच्या छायेत वाढत असतानाही बाबासाहेबांनी शिक्षणाला जीवनाचे सर्वोच्च ध्येय मानले.

“शिक्षण हेच माणसाच्या मुक्तीचं सर्वात मोठं शस्त्र आहे!” हे त्यांचे अमर वचन आजही प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात प्रेरणा निर्माण करते.

**शिक्षण हेच परिवर्तनाचं शस्त्र**

बालपणीच्या संघर्षातून त्यांनी दाखवून दिलं की परिस्थिती कितीही कठीण असली तरी ज्ञानाने सर्व अंधःकार दूर करता येतो. वाचन, अभ्यास आणि सातत्य या त्रिसूत्रीने त्यांनी केवळ भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासात आपलं नाव सुवर्णाक्षरांनी कोरलं.

त्यांच्या विचारांतून जगाला समजलं की शिक्षण म्हणजे फक्त पदवी नव्हे, तर विचारांची खोली आणि चारित्र्याची उंची!

**आधुनिक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा**

आजच्या युगात मोबाईल आणि इंटरनेटमुळे पुस्तकांचं महत्त्व कमी झालं असलं तरीही बाबासाहेबांचा “वाचाल तर वाचाल” हा संदेश तितकाच जिवंत आहे.

विद्यार्थ्यांनी वाचनाची सवय जोपासून, ज्ञान, प्रामाणिकता आणि चारित्र्य यांना जीवनाचं सूत्र बनवायला हवं.आजचा विद्यार्थी म्हणजे उद्याचा राष्ट्रनिर्माता — त्याचं शिक्षण देशाचं भविष्य ठरवतं. त्यामुळे शिक्षणासोबत विचार, समज, आणि संवेदनशीलता ही जोपासणं अत्यावश्यक आहे.

**बाबासाहेबांना कोटी कोटी अभिवादन**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षणप्रेमाला, त्यागाला आणि संघर्षाला आज संपूर्ण समाज कोटी कोटी अभिवादन करतो. त्यांनी दाखवलेला मार्ग आजही प्रत्येक विद्यार्थ्याला प्रेरणा देतो.“शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा” — हा त्यांचा अमर संदेश आजही समाज परिवर्तनाची दिशा दाखवतो, कारण प्रत्येक शिक्षित विद्यार्थी हा समाज बदलू शकतो!

**विद्यार्थी दिनाच्या शुभेच्छा!**

ज्ञान, विचार आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाज आणि राष्ट्र उन्नत करण्याचा संकल्प करूया.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आदर्शांवर चालत शिक्षणाला आपल्या जीवनाची संस्कृती बनवूया!



# प्रतिभा इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंगचा १०० टक्के निकाल

### आरोग्यसेवेत यश परंपरेला सलाम - सलग दहाव्या वर्षी उत्कृष्ट कामगिरी



**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई वार्ताहर**

नवी मुंबईतील घणसोली येथील *आदित्य हेल्थ ॲण्ड एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग* ने पुन्हा एकदा आपली यश परंपरा कायम ठेवत *महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई तर्फे सप्टेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या जी.एन.एम. परीक्षेत १०० टक्के निकाल मिळविला आहे.* सर्व विद्यार्थीनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या असून, संस्थेचा सलग दहाव्या वर्षी शंभर टक्के निकालाचा मान राखला आहे.या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थापक डॉ. प्रतिक प्रभाकर तांबे व संचालिका डॉ. विजया प्रतिक तांबे यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन करताना सांगितले की, "नर्सिंग प्रशिक्षणातून आरोग्यसेवेचे व्रत हाती घेणाऱ्या विद्यार्थिनींची समाजात लौकिकता वाढत असून, हा निकाल आमच्यासाठी अभिमानास्पद आहे."भारतीय परिचर्या परिषद (नवी दिल्ली), महाराष्ट्र परिचर्या परिषद (मुंबई), महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ (मुंबई) आणि महाराष्ट्र शासन यांची मान्यता असलेल्या या संस्थेमध्ये जी.एन.एम. (३ वर्षे) व ए.एन.एम. (२ वर्षे) हे अभ्यासक्रम गेली १५ वर्षे यशस्वीपणे सुरू आहेत.

यंदाच्या जी.एन.एम. तृतीय वर्षाच्या निकालात प्रचिती जयवंत शेळके हिने प्रथम क्रमांक, वेदिका विवेक पाटील हिने द्वितीय क्रमांक, तर नेहा दादू मटकर हिने तृतीय क्रमांक पटकावला आहे. तसेच ए.एन.एम. द्वितीय वर्षात प्रिती अरुण सावर्डेकर प्रथम, आकृती मच्छिंद्र रणधीर व निर्जला नवनाथ कोंढाळकर संयुक्त द्वितीय, तर जयश्री सचिन कानाडे तृतीय आली आहे.

या सर्व यशस्वी विद्यार्थीनींचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रतिक प्रभाकर तांबे, संचालिका डॉ. विजया तांबे, व्यवस्थापक किरण शेडगे, प्राचार्या प्रणिता क्षिरसागर, तसेच अध्यापक प्रमिला थुले, वृषाली शिंदे, सोनाली मनवटकर, अक्षता खापणकर, श्वेता पवार, जेनिफर सॅम्युअल, आरती निवडुंगे, संचना मंडपे, दिव्या अहिरे, डॉ. विधी दळवी आणि शिक्षकेत्तर कर्मचारी लता काळे, नूतन खंबायत यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले.संस्थेचा सातत्यपूर्ण शंभर टक्के निकाल हा गुणवत्तापूर्ण अध्यापन, विद्यार्थीनींची मेहनत व व्यवस्थापनाचा शैक्षणिक दृष्टीकोन यांचे फलित असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले.

# महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याची वंचितची मागणी

### मंत्रालयासमोर निषेध मोर्चा, पोलिसांचा लाठीचार्ज, महिला कार्यकर्त्या जखमी

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी**

डॉ. संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणातील असंवेदनशील आणि स्त्रिविरोधी वक्तव्यामुळे महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरत आहे. वंचित बहुजन महिला आघाडी मुंबईने यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कार्यालयासमोर मंत्रालयाजवळ निषेध मोर्चा काढला. मात्र, राज्य सरकारने हा मोर्चा दाबण्यासाठी पोलिसांकडून लाठीचार्ज करून कार्यकर्त्यांना मारहाण केली आणि ताब्यात घेतले. या अमानुष कारवाईमुळे अनेक कार्यकर्त्यांच्या कपड्यांचे फाटले, तर मुंबई प्रदेश महिला अध्यक्ष स्नेहल सोहनी यांच्या हाताला दुखापत झाली. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी या घटनेचा तीव्र निषेध केला आहे.

**प्रकरणाची पार्श्वभूमी: असंवेदनशील वक्तव्य आणि वंचितची मागणी**

डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येच्या प्रकरणात महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी महिलांबाबत असंवेदनशील आणि स्त्रिविरोधी वक्तव्य केल्याचा आरोप वंचित



बहुजन महिला आघाडीने केला आहे. या वक्तव्यामुळे महिलांच्या सुरक्षिततेच्या मुद्द्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, चाकणकर यांच्या पदावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. वंचित बहुजन महिला आघाडीने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गटाचे) प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्याकडे मागणी केली होती की, महिलांबाबत सातत्याने असंवेदनशील पद्धतीने वक्तव्य करणाऱ्या चाकणकर यांना तात्काळ पदावरून हटवावे. मात्र, या मागणीला प्रत्युत्तर म्हणून सरकारने पोलिसबळाचा वापर करून मोर्चा दाबण्याचा प्रयत्न केला.

**निषेध मोर्चा आणि पोलिस कारवाई: जखमीरित्या आणि अमानुष वागणूक**

मुंबईतील वंचित बहुजन महिला आघाडीच्या नेतृत्वाखालील कार्यकर्त्यांनी मंगळवारी मंत्रालयासमोर निषेध मोर्चा काढला. यावेळी पोलिसांनी लाठीचार्ज करून मोर्चा रोखला आणि कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. धक्काबुक्की दरम्यान अनेकांच्या कपड्यांचे फाटले, तर महिलांना अमानुषपणे वागणूक देण्यात आली. जखमी झालेल्यांमध्ये मुंबई प्रदेश महिला अध्यक्ष स्नेहल सोहनी (हाताला दुखापत), राज्य प्रवक्ता आणि राज्य महिला आयोग माजी सदस्या उत्कर्षाताई रूपवते, तसेच इतर पदाधिकारी आणि कार्यकर्त्या यांचा समावेश आहे. सोहनी यांनी सांगितले, "महिलांच्या हक्कांसाठी लढत असताना पोलिसांकडूनच हिंसा होणे हे लज्जास्पद आहे. चाकणकर यांच्या वक्तव्याला विरोध करत असताना आम्हाला धडक मारली गेली."

या कारवाईमुळे वंचित बहुजन आघाडीतील नेत्यांमध्ये रोष निर्माण झाला असून, मोर्च्यात सहभागी झालेल्या महिलांनी पोलिसांच्या या वर्तनाचा तीव्र निषेध केला. कार्यकर्त्यांनी म्हटले, "महिला आयोगाच्या अध्यक्षा महिलांविरोधी बोलतात आणि सरकार पोलिसांद्वारे महिलांवरच हल्ला करते. ही दुर्दैवी स्थिती आहे."

**प्रकाश आंबेडकरांचा तीव्र निषेध: सरकारवर टीका**

वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष आणि प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी या पोलिस कारवाईचा तीव्र निषेध केला आहे. त्यांनी जारी केलेल्या निवेदनात म्हटले, "महिलांच्या असंवेदनशील वक्तव्यावर प्रश्न उपस्थित करणाऱ्या शांततापूर्ण मोर्चावर पोलिस बळाचा वापर करणे हे लोकशाहीविरोधी आणि स्त्रिविरोधी आहे. रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी योग्य आहे आणि सरकारने ती मान्य करावी. जखमी कार्यकर्त्यांवर कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत." आंबेडकर यांनी या प्रकरणात तात्काळ चौकशीची मागणीही केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि महायुती सरकारवरून या प्रकरणात राजकीय टीका होत आहे. विरोधकांनी म्हटले की, महिला आयोगाच्या अध्यक्षा असलेल्या व्यक्तीने महिलांच्या भावनांचा आदर न केल्यास तिचे पद काय अर्थपूर्ण राहते? वंचित बहुजन आघाडीने जखमी कार्यकर्त्यांसाठी न्याय मागण्यासाठी आंदोलनाचा इशारा दिला असून, येत्या काळात मोठ्या प्रमाणावर निषेध मोर्चे काढण्याची शक्यता आहे. सुनील तटकरे यांच्याकडून अद्याप कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही.

या घटनेमुळे महाराष्ट्रातील महिलांच्या सुरक्षितता आणि राजकीय जबाबदारीच्या मुद्द्यावर नवीन चर्चा सुरू झाली असून , प्रकरणाचा निकाल काय होणार याकडे लक्ष लागले आहे.

# पेण. वेद मंत्राहून वंद्य आम्हा वंद्य वदेमातरम..पेण पालिका क्रिडागंणावर उसळले राष्ट्रभक्तीचे चैतन्य..

**दैनिक युवक आधार**
**पेण.,दीपक लोके** :

पेण तहसीलदार कार्यालय आणि आयटीआय शिक्षण संस्था आयोजित वंदे मातरम गीताला १५० वर्ष झाली या दीड शतकातील भारतीय नागरिकांना प्रेरणादायी ठरलेल्या राष्ट्रगीताचा सन्मान आज पेण नगरपालिका मैदानावर ओसंडून वाहत होता.विद्याथी वंदे मातरम्, भारतमाता की जय या जयघोषाने सकाळी ९.३० ते १ वाजेपर्यंत आसमंत दुमदुमून गेले काय विलक्षणता आहे या राष्ट्रगीतात तो हा इतिवृत्तात याची देही याची डोळा पेणकरांनी मन भरून अनुभवला.वंदे मातरम्' आणि 'राष्ट्रीयत्व' यांचा संबंध देशाच्या



स्वातंत्र्याच्या लढ्यातून आणि राष्ट्रीय अस्मितेच्या निर्मितीमध्ये आहे. 'वंदे मातरम्' हे राष्ट्रभक्ती आणि मातृभूमीवरील प्रेमाचे प्रतीक आहे, तर राष्ट्रीयत्व म्हणजे देशाशी जोडलेली ओळख आणि अभिमान. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी आनंदमठ कांदबरीमधे रचलेल्या या कवितेने स्वातंत्र्य लढ्यात स्वातंत्र्यसैनिकांना प्रेरणा दिली आणि ते परकीय राजवटीविरुद्धच्या प्रतिकाराचे प्रतीक बनले, ज्यामुळे ते राष्ट्रीय अस्मितेचा एक महत्त्वाचा भाग बनले. आज पेण नगरपालिका मैदानावर सुमारे ५००० विद्यार्थ्यांसमवेत देशप्रेमी नागरीक राजकीय क्षेत्रातील नेते मंडळी शासकीय अधिकारी प्राचार्य शिक्षक शासकीय कर्मचारी महिलांच्या उपस्थित वंदे मातरम् राष्ट्रगीत मोठ्या अभिमानाने गाईले यानंतर आयटीआयच्या विद्यार्थ्यांनी वंदे मातरम् ही नाटीका सादर करीत या गितातील प्रत्येक काव्यपंक्ती उलगडा सादरीकरण करीत अखंड भारत राष्ट्रीय एकात्मता राखण्यासाठी उपस्थितांना आवाहन केले..

या कार्यक्रमासाठी प्रांत अधिकारी प्रविण पवार तहसीलदार तानाजी शेजाळ,नायब तहसीलदार तर खासदार धैर्यशील पाटील, नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी उपस्थिती दर्शविली.आयटीआय प्राचार्य श्री सदाशिव जनार्दन पाटील, मुख्य समन्वयक-श्रीमती प्रीती शिरसाठ - संदानशिव,वरिष्ठ निदेशक-श्री प्रवीण संदानशिव निदेशक :-प्रफुल्ल फड विजय साळवी , प्राजक्ता मोते, वनश्री मेश्राम,नंदकुमार लोंढे, श्री विजय पाटील, श्रीमती आरती घरत, श्रीमती श्रुती साळुंखे श्री नवनाथ कोळी व समस्त शासकीय तांत्रिक विद्यालय पेण कर्मचारी पेण प्रायव्हेटचे प्राचार्य आर.एम. म्हात्रे सार्वजनिक विद्यामंदिरचे प्राचार्य नाईक सर यांनी या कार्यक्रमासाठी विशेष योगदान दिले

# महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनाच्या पुर्वतयारीचा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी घेतला आढावा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनाच्या पुर्वतयारी चा आढावा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी गुरुवारी सह्याद्री अतिथीगृह येथे घेतला.येत्या ६ डिसेंबर २०२५ रोजी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनी चैत्यभूमी येथे अभिवादनासाठी येणाऱ्या लाखो भीम अनुयायांना पुरविण्यात येणाऱ्या सोयी सुविधा; सुरक्षा ;आरोग्य; स्वच्छता आदी कामाच्या पूर्वतयारीचा आढावा घेणारी बैठक ना. रामदास आठवले यांनी घेतली.यावेळी जिल्हा अधिकारी आचल गोयल; बार्टीचे महासंचालक सुनील वारे; राज्य उत्पादन शुल्क आयुक्त विश्वनाथ इंदिसे; मुंबई मनपा चे सपकाळ; एम एम आर डी ए; रेल्वे; पोलिस आदी विभागांचे अधिकारी;पूज्य बौद्ध भदंत डॉ राहुल बोधी महाथेरो आणि महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक चैत्यभूमी येथे असणारा स्तूप जीर्ण झाला असून त्या ठिकाणी दीक्षाभूमी सारखा भव्य स्तूप उभारला पाहिजे.मुंबईतील विधानभवन च्या धर्तीवर चैत्यभूमी चा स्तूप आणि पाठीमागे चैत्यभूमी ची इमारत उभारून विकास केला पाहिजे.चैत्यभूमी जवळच्या सेल्फी पॉईंटपासून इंदुमिलपर्यंत समुद्रातून रस्ता बनवला पाहिजे आदी सूचना ना.रामदास आठवले यांनी केल्या.चैत्यभूमी येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायांना भोजनदान करण्यात येणार आहे. किमान १ लाख अनुयायांना भोजनदान करण्यात येणार आहे. महापरिनिर्वाण दिनी पावसाची शक्यता असल्यास आपत्तीव्यवस्थापन ची यंत्रणा तयार ठेवण्याबाबत चर्चा झाली. अनुयायांना सुरक्षा पुरविणे अन्नदान आरोग्य आदी सुविधा आणि ट्रॅफिक रेल्वे पुरविण्याबाबत आदी कामांच्या पूर्वततयारीचा आढावा ना.रामदास आठवले यांनी घेतला.यावेळी अनेक रिपाइं चे नेते उपस्थित होते.

# कन्या केंद्र शाळा सोयगावचा अभिमान! "किल्ले बनवा स्पर्धे"त शाळेचा राज्यस्तरीय गौरव....

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव:-** येथील कन्या केंद्र शाळा येथे घेण्यात आलेल्या "किल्ले बनवा स्पर्धेची" दखल थेट महाराष्ट्र शासनाने घेतली असून, या उपक्रमासाठी शाळेला राज्याचे मुख्यमंत्री यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.शाळेच्या शिक्षकांना हे प्रमाणपत्र मा.मनिषा मेने मॅडम तहसीलदार, सोयगाव,मा. यमुलवाड साहेब गटविकास अधिकारी, मा.सचिन शिंदे



गटशिक्षणाधिकारी व मा.फिरोज तडवी केंद्रप्रमुख,सोयगाव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.या यशामुळे शाळेच्या शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून,स्थानिक समाजात केंद्र शाळेच्या उपक्रमाचे भरभरून कौतुक होत आहे.

# यु.ई.एस उरण शाळेला आदर्श शाळा पुरस्कार

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर**

समाज सेवा हीच खरी ईश्वर सेवा हे ब्रीद वाक्य घेऊन आज वर चाईल्ड केअर सामाजिक संस्था रायगड श्री विकास कडू संस्थापक -अध्यक्ष ह्याच्या नेतृत्वा खाली ९ वर्ष समाज सेवेचे उपक्रम राबवत आहेआज आदर्श शाळा तालुका हा उपक्रम हाती घेऊन रायगड जिल्हातील प्रत्येक तालुक्यात आदर्श शाळा निवडत आहे त्या प्रमाणे उरण मधून उरण एजुकेशन सोसायटी ह्या शाळेला उरण तालुका आदर्श शाळा



पुरस्कार देण्यात आला .सादर पुरस्कार आवाज महामुंबईचा न्यूज चैनल चे सपादक मिलिंद खारपाटील साहेब (सल्लागार )यांच्या शुभ हस्ते यु.ई.एस चे मानद सचिव ॲड.राजेंद्र भानुशाली व यु.ई.एसचे प्राचार्य सिमरण दहिया यांनी स्वीकारले तेव्हा आमच्या प्रतिनिधी सोबत बोलताना ॲड.राजेंद्र भानुशाली म्हणाले की "आत्ता उरण तालुक्यातून आमच्या शाळेला आदर्श शाळा उरण म्हणून पुरस्कार मिळाला त्या बद्दल मी चाईल्ड केअर सामाजिक संस्था रायगड चे आभारी आहोत आणी या पुढे यु.ई.एस शाळेची जबाबदारी वाढेल व शाळेतील मुलांसाठी आणखी काही जास्तीत जास्त विकास कसा होईल ह्या गोष्टीवर भर देण्यात येईल" तसेच या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार विठ्ठल ममताबादे (मीडिया सल्लगार ) ॲड. विजेंद्र पाटील (कायदेशीर सल्लागार ) आभिनेते चेतन दादा पाटील (संस्कृतीक विभाग रायगड प्रमुख ) यांची उपस्थिती होती तर यु.ई.एस शाळे तर्फे समन्वयक मितेश पुरारकार, पर्यवेश्रिका सोनाली म्हात्रे, पर्यवेश्रिका श्रीमती योगिता चौधरी, पर्यवेश्रीका कु नैना सिंग, पर्यवेश्रिका सौ रेश्मा वैदय,पत्रकार श्री दिनेश पवार,पालकप्रतिनिधी सौ अनुश्री पाटील,सौ सरिता गुप्ता उपस्थितीत होते तर संस्थे तर्फे संस्थे चे संस्थापक-अध्यक्ष श्री विकास कडू, कार्याध्यक्ष श्री मनोज ठाकूर, कोषध्यक्ष श्री रोशन घरत, सदस्य श्री रोशन धुमाळ, कु अभिषेक माळी, कु विवेक कडू हे उपस्थित होते .

कार्यक्रम चे प्रास्ताविक श्री विकास कडू यांनी केले ते बोलताना म्हणाले "यु.ई.एस ही एक शाळा नसून एक कुटूंब आहे, कारण शाळेत मुलांच्या शिक्षणा ची खूप चांगल्या प्रमाणात काळजी घेतली जाते.

# तळा येथे वंदे मातरम् गीताने जागवली देशभक्तीची भावना

**दैनिक युवक आधार**

**तळा वार्ताहर** : वंदे मातरम् गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या प्रांगणात ७ नोव्हेंबर रोजी वंदे मातरम् सामूहिक गीत गायनाचा भव्य व उत्साहवर्धक कार्यक्रम संपन्न झाला. या निमित्ताने परिसरात देशभक्तीचे सूर घुमले व राष्ट्रभक्तीची भावना ओसंडून वाहताना दिसली.

या गौरवशाली सोहळ्यास समितीच्या अध्यक्षा व तळा येथील तहसीलदार श्रीमती स्वाती पाटील, प्रमुख अतिथी श्री सुनील जगताप, तळा पोलीस ठाणेचे पीएसआय श्री विजय पाटील, तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे विश्वस्त श्री मारुती शिर्के गुरुजी, सचिव श्री



मंगेशशेठ देशमुख, शाळा समितीचे चेअरमन श्री महेंद्रशेठ कजबजे, सी. डी. देशमुख औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य श्री एस. एन. शेरे, उद्योजक श्री पांडुरंग महाडिक, श्री किशोर वेदक, श्री सुभाष मुंढे, गो. म. वेदक विद्यामंदिर तळाचे मुख्याध्यापक श्री दिलीप ढाकणे यांच्यासह तळा शहरातील विविध शाळा व महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात बंकिमचंद्र चटर्जी यांनी लिहिलेल्या अमर देशभक्तीपर वंदे मातरम् गीताच्या सामूहिक गायनाने झाली. उपस्थित मान्यवर, शिक्षक, श्री रोहित भागवत, विद्यार्थी व पालकांनी एकत्रितपणे गायन करताच संपूर्ण परिसर राष्ट्रभक्तीने भारावून गेला. हा क्षण भारतमातेच्या स्तुतीचा गौरव दिवस म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी सी. डी. देशमुख औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर पथनाट्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. त्यानंतर श्री सुनील जगताप यांनी व्याख्यानातून वंदे मातरम् या गीताचा ऐतिहासिक प्रवास, महत्त्व आणि प्रेरणादायी संघर्ष उलगडून सांगितला. कार्यक्रमाचे उत्कृष्टरित्या निवेदन श्री सुहास वावेकर यांनी केले. यावेळी प्राथमिक विद्यामंदिर, गो. म. वेदक विद्यामंदिर, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, जी. एम. वेदक सायन्स कॉलेज, जिल्हा परिषद शाळा तसेच तहसील कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या भव्य सोहळ्यामुळे तळा शहरात देशभक्तीची लहर नव्याने उमटल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# ऋतुजा कड यांची 'क्लास वन' अधिकारी पदी निवड; प्रशासकीय सेवेत नवा उत्साह!

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) २०२४ साली झालेल्या प्रतिष्ठित परीक्षेत श्रीमती ऋतुजा रत्नमाला नंदाराम कड यांनी नेत्रदीपक यश संपादन करत 'क्लास वन' अधिकारी पदावर निवड मिळवली आहे. त्यांच्या या उत्तुंग यशाबद्दल सर्व स्तरांतून मनःपूर्वक अभिनंदन होत आहे. मंत्रालय सहाय्यक कक्ष अधिकारी या पदावर कार्यरत असलेल्या श्रीमती कड यांनी समर्पित भावनेने आणि सातत्यपूर्ण अभ्यासातून हे यश खेचून आणले आहे. त्यांची



'क्लास वन' अधिकारी पदावर झालेली निवड ही त्यांच्या कठोर परिश्रमाचे आणि दृढ निश्चयाचे मूर्तिमंत उदाहरण ठरली आहे.

ऋतुजा कड यांच्या निवडीमुळे त्यांच्या कुटुंबियांमध्ये आणि संपूर्ण पंचक्रोशीत आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या या यशाने परिसरातील अनेक तरुण-तरुणींना प्रशासकीय सेवेत येण्यासाठी मोठी प्रेरणा मिळाली आहे. समाजाच्या भल्यासाठी आणि पारदर्शक प्रशासनासाठी त्या आपले बहुमोल योगदान देतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी
# युवक आधार

संपादक - संतोष शिवदास आमले

मुख्य संपादक - भारती आमले | उपसंपादक - श्री विलास गायकवाड | कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे | निवासी संपादक- श्री राकेश पाटील | सह संपादक - श्री मुकुंद कांबळे | महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 | अंक : ६० | शनिवार, ०८ नोव्हेंबर २०२५ | किंमत : ४ रु | पृष्ठ : ८ | RNI MAHMAR/2023/89514

त्वरित पत्रकार पाहिजेत !
महाराष्ट्र व देशासह जगभरात डिजिटल माध्यमातून पोहचणारे दैनिक युवक आधार
PRESS
महाराष्ट्रातील सर्व जिल्हे,तालुका, जिल्हा परिषद सर्कल,लोकसभा, विधानसभा या क्षेत्रांमध्ये पत्रकार पाहिजेत
अधिक माहिती साठी संपर्क
श्री संतोष शिवदास आमले
संपादक - ९२२०४०३५०९

जय महाराष्ट्र... जय कामगार...

## धडक कामगार युनियन महासंघ, हिंदवी स्वराज्य संघटना व मैत्री संस्था आयोजित

कामगार हृदयसम्राट व मुंबई मित्र संपादक

## मा. श्री. अभिजीत दादा राणे

यांच्या वाढदिवसानिमित्त... कामगार विषयावर निमंत्रितांचे कवी संमेलन गौरव सोहळा व स्नेह मिलन

रविवार, दिनांक ९ नोव्हेंबर २०२५ रोजी
सायं. ४.३० ते ८.०० पर्यंत




: उद्घाटक :
**मा. अनिल थत्ते** (मराठी बीग बॉस फेम, पत्रकार - साप्ताहिक गगणभेदी)

समारंभ अध्यक्षा
**मा. दिलिप नारद** (पोलीस मित्र, कवी व समाजभूषण)

प्रमुख अतिथी
**मा. राजू राम** (संपर्क प्रमुख, बेटी बचाव, बेटी पढाव अभियान, महाराष्ट्र)
**मा. उत्तमराव तरकसे** (क्राईम ब्रांच पोलीस अधिकारी, कवी, साहित्यीक, समाजभूषण)
**मा. स्पृहा सुरेश इंदू** (आदर्श शिक्षिका)
**मा. प्रभाकर कांबळे** (गुणवंत कामगार, पत्रकार व अध्यक्ष-वनिता फाऊंडेशन)

विशेष अतिथी
**मा. मकरंद वांगणेकर** (प्रसिध्द कामगार कवी)

प्रमुख उपस्थिती
**मा. संभाजीराजे जाधावराव**
(इतिहास अभ्यासक व राजमाता माँ साहेब जिजाऊ यांचे १४ वे वंशज))

स्वागताध्यक्ष
**मा. विलास खानोलकर** (मा. सदस्य फिल्म सेंसॉर बोर्ड)



श्री. अभिजित दादा राणे यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...

: संयोजक :




• निमंत्रक •
पर्यावरण मित्र तानाजी फणसे, कवी व योग शिक्षक संतोष खरटमोल, आदर्श शिक्षिका मनिषा मांढरे, अभिनेत्री निशा जाधव, मुक्त पत्रकार विनायक जवळेकर, कवी गुरुदत्त वागदेकर, सामाजिक कार्यकर्ता किरण डवले, विक्रमी रक्तदाते साई रामपूरकर, सामाजिक कार्यकर्त्या छाया अमृले, शिवश्री विजय भोसले, अश्विनी निवाते, विनोद हिवाळे, गुणवंत कामगार राजेंद्र कांबळे

• विशेष सहयोग •
सामाजिक कार्यकर्ता समन्वय समिती, संकल्प संस्था, जय महाराष्ट्र पत्रकार लेखक कवी महासंघ व मैत्री संस्था

कृपया आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे...

स्थळ : धडक कामगार युनियन कार्यालय, ऑफिस ऑफ फायर ब्रिगेड, संक्रमण स्टुडीओ जवळ, महाराष्ट्र कृषी उद्योग भवन समोर, आरे मिल कॉलनी, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे जवळ, गोरेगांव (पूर्व), मुंबई.

संपर्क : 99696 86014 / 99877 46776

मराठी माणिकांच्या विचारांचे प्रतिनिधित्व करणारे दैनिक मुंबई मित्र — मराठी दैनिक • हिन्दी दैनिक
विशाल महाराष्ट्र Youtub Channel